शनिवार । २५ एप्रिल १९८१ । एक रुपया

# माणूस

## रायगड जिल्ह्यातील एक उपेक्षित डोंगरपट्टी...

पृष्ठ ... ११

**सप्रेम नमस्कार**

□ 'माणस' ११ एप्रिल १९८१ या अंकामध्ये 'संस्कृतिरक्षण...' या सदरात श्री. विनय र. गुणे (संगमनेर) यांनी लिहिलेला मजकूर प्रसिद्ध झाला आहे. त्यासंबंधी माझ्या मनात जे विचार आले ते व्यक्त करीत आहे.

श्री. गुणे यांनी संस्कृतिरक्षकांच्या बाबतीत त्यांना स्वतःला काय वाटते ते लिहिण्यापूर्वी त्यांच्या स्वतःच्या कार्याचा परिचय प्रथम करून दिला असता तर अधिक बरे झाले असते. सदर मजकूर वाचत असताना त्यातील प्रसंग कोणाच्याही मनात चीड आणणारे असेच आहेत [आणि असे प्रसंग पुन्हा घडू नयेत म्हणून श्री. गुणे यांनी काही प्रयत्न केला असेल व त्यासंबंधी पुढे काही वाचायला मिळेल, असे वाचणाराला वाटते; पण कसचे काय? लेखाच्या शेवटी संस्कृतिरक्षकांना वेठीला धरून श्री. गुणे यांनी आपल्यावरचे उत्तरदायित्व चक्क झटकून टाकल्याचे दिसते.

ज्या संस्कृतिरक्षकांसंबंधी श्री. गुणे यांच्या मनात चीड आहे, त्यांनीच महाराष्ट्रातील ठाणे व धुळे जिल्ह्यातील वनवासी क्षेत्रात अनेक सेवाकार्ये उभी केली आहेत. मध्यप्रदेशातील वनवासी कल्याण आश्रमाचे कार्य तर भारतभर मान्यता पावलेले आहे. ही वानगीदाखल उदाहरणे आहेत. अशा स्थितीत '...आदिवासींसाठी काही करता आलं तर बघावं....' असा अनाहूत सल्ला संस्कृतिरक्षकांना देण्याऐवजी श्री. गुणे यांनी या विषयासंबंधात काही कार्य केले असल्यास ते वाचकांपुढे मांडावे म्हणजे वाचकच त्यांच्या कार्याला व त्यांना स्वतःलाही मानतील. दुसऱ्यांवर दोषारोप करून स्वतःकडे मोठेपणा घेण्याची सध्या फॅशनच झाली आहे. तसे होऊ नये म्हणजे झाले!

१३ एप्रिल

**वसंत दिगंबर पुजारी**
मु. पो. सांगोले, जि. सोलापूर

# सामान्यांचे आशास्थान, आश्रयस्थान–वृत्तपत्र

**–न्या. धर्माधिकारी**

शनिवार ता. १८ एप्रिल, पुण्यातलं टिळक स्मारक मंदिराचं भव्य रंगमंदिर. आज या ठिकाणी पुणे शहर नागरिक सत्कार समितीच्या वतीने पुण्यातल्या चार प्रमुख दैनिकांच्या महोत्सवी वर्षानिमित्त खास समारंभ आयोजित करण्यात आला होता. आपलं शताब्दी वर्ष नुकतंच पूर्ण केलेलं 'केसरी', सुवर्णमहोत्सवी वर्ष सध्या साजरं करत असलेले 'सकाळ' आणि 'प्रभात' व रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण केलेलं 'तरुण भारत' या चार दैनिकाच्या संपादकांचा मानचिन्ह देऊन आज या रंगमंदिरात सत्कार होणार होता.

माजी पंतप्रधान मोरारजी देसाई समारंभाचे प्रमुख पाहुणे होते, तर न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी अध्यक्षस्थानी होते. व्यासपीठावर 'सकाळ'चे संपादक श्री. ग. मुणगेकर, 'केसरी'चे संपादक चंद्रकांत घोरपडे, 'तरुण भारत'चे संपादक वि. ना. देवधर आणि 'प्रभात'चे संपादक माधवराव खडकर हेही होते.

समारंभाचं प्रास्ताविक करताना सत्कार, समितीचे कार्याध्यक्ष उपमहापौर डॉ. सतीश देसाई यांनी सांगितलं की, 'चार दैनिकांनी एकाच वर्षात निरनिराळी महोत्सवी वर्षे साजरी करणं हा दुर्मिळ योगायोग आहे व अशा दैनिकांविषयी सामान्य वाचकाला वाटणारी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आजचा हा समारंभ आयोजित केलेला आहे.

'वृत्तपत्राशी वाचकाचं जिव्हाळ्याचं, अतूट नातं असतं; पण कदाचित या जास्त जवळिकेमुळेच वृत्तपत्राच्या महत्त्वाच्या टप्प्याचं वाचकांना विस्मरण होण्याची शक्यता असते. म्हणून या चार दैनिकांनी आज जो टप्पा गाठला आहे त्याचं गौरवपूर्वक स्मरण करण्यासाठीही आजच्या या समारंभाचं आयोजन केलं आहे'

डॉ. देसाई यांच्या या छोट्याशा प्रास्ताविकानंतर या चार दैनिकाच्या संपादकांना श्री. मोरारजीभाई देसाई यांच्या हस्ते सुबक व रेखीव मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. तसंच या दैनिकाचे संस्थाचालक या नात्याने डॉ. बानू कोयाजी (सकाळ), श्री. चंद्रकांत घोरपडे (केसरी), डॉ वि. रा. करंदीकर (तरुण भारत) आणि श्री. शेखर गाधी (प्रभात) यांना पाहुण्याच्या हस्ते मानपत्रंही देण्यात आली. प्रसिद्ध साहित्यिक श्री. ज. जोशी व डॉ. विद्याधर पुंडलिक यानी या मानपत्राचं लेखन केलं होत.

या मुख्य समारंभानंतर चारही दैनिकाच्या संपादकानी सत्काराला उत्तरं देणारी भाषणं केली.

आजच्या या समारंभाद्वारे नागरिकांना वृत्तपत्राविषयी वाटणारी जी कृतज्ञता व्यक्त होत आहे तिच मोल फार मोठं आहे, असं सागून 'केसरी'चे संपादक चद्रकांत घोरपडे आपल्या भाषणात म्हणाले, 'या चार दैनिकांपैकी प्रत्येकाच रग, रूप आणि चेहरा संपूर्णपणे निराळा आहे; पण अशी विविध रंगरूपाची वर्तमानपत्रं आम्हाला हवी आहेत, हेच मत पुणेकरानी आजच्या या समारंभातून व्यक्त केलं आहे.

'दैनिक 'केसरी'मध्ये वेळोवेळी व्यक्त होणारे विचार त्या त्या काळातल्या प्रत्येक माणसाला रुचले असतीलच असं नाही; पण हे विचार जेव्हा मांडले जातात तेव्हा त्यामध्ये स्वार्थाचा लवलेशही नसतो, याची वाचकाला खात्री असते, म्हणूनच तो हे वर्तमानपत्र स्वीकारतो.

'कोणतही वृत्तपत्र हे तत्कालीन समाजातूनच निर्माण होत असतं, म्हणून त्या समाजाच्या गुण-दोषाचं, उंचीचं प्रतिबिंब वृत्तपत्रातही दिसतं; पण त्याच वेळी समाजाला दिशा दाखविण्याची जबाबदारी वृत्तपत्राना पार पाडावी लागते. यामध्ये पुण्यातील ही चार वृत्तपत्रं यशस्वी झाल्याची पावतीच आजच्या या समारंभानं दिली आहे.'

'सकाळ'चे संपादक श्री. ग. मुणगेकर आपल्या भाषणात म्हणाले, 'सकाळ'चे संस्थापक डॉ नानासाहेब परुळेकर यांनी


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : विसावे

अंक : सत्तेचाळिसावा

२५ एप्रिल १९८१

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी
चाळीस रुपये


प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

आपल्या आत्मचरित्रात पुणे शहरानं त्याना घडवलं, अशी नोंद केली आहे. ' सकाळ 'ला सुद्धा पुणेकरानी घडवलं, असं डॉ. परुळेकरानी म्हटलं आहे; पण त्याचबरोबर ' सकाळ 'ने सुद्धा पुणे शहराचं जीवन घडविण्याचा प्रयत्न केला आहे. १९३४–३५ पासून या शहराच्या विविध नागरी प्रश्नांमध्ये ' सकाळ 'ने सतत लक्ष घालून ते प्रश्न सोडविण्यासाठी जागरूकपणे धोरणं व कार्यक्रम आखले पाहिजेत, असा आग्रह धरला. नागरी विकासासाठी पक्षभेद बाजूला ठेवून काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांचा गट उभा करण्याचं कामही 'सकाळ 'ने १९५२ मध्ये ' नागरी संघटने 'ची स्थापना करून सुरू केलं व ते आजही चालू आहे '

वर्तमानपत्राविषयी बाहेर वातावरण तापत चाललं असताना हा समारंभ म्हणजे विशेष आल्हाददायक प्रसंग आहे, असं सांगून श्री. मुणगेकर पुढे म्हणाले, 'सध्याच्या राज्यकर्त्यांची धोरणं व दृष्टिकोनाचा विचार केल्यास वृत्तपत्राच्या दृष्टीनं ती अनुदार आहेत, असं म्हणावं लागतं. वृत्तपत्र कागदावरील कर १५ टक्क्यानी वाढवून केंद्र शासनानं आर्थिकदृष्ट्या विशेष काहीही मिळवलेलं नाही. कारण या करातून जेमतेम १५ ते २० कोटी रुपये मिळणार आहेत आणि शासनाची पंधराशे कोटी रुपयाची तूटही कायमच राहणार आहे; हे लक्षात घेतलं तर तूट भरून काढणं हा शासनाचा या करवाढीमागील मुख्य दृष्टिकोण वाटत नाही.

' अर्थात वर्तमानपत्राच्या अर्थकारणावरील हा आघात शेवटी वाचकानाच सोसावा लागणार आहे. म्हणून यापुढील काळात या देशातली वृत्तपत्रं वाचकाच्या सहानुभूतीवरच तग धरू शकतील' असा इशाराही श्री. मुणगेकर यांनी दिला.

'प्रभात'चे संपादक माधवराव खंडकर आपल्या भाषणात म्हणाले, 'पुण्यातल्या इतर वृत्तपत्रापेक्षा ' प्रभात' हे वेगळ्या प्रकृतीचं, वेगळं वर्तमानपत्र आहे. गेल्या पन्नास वर्षांपैकी सुमारे ४०–४२ वर्षं कै. कोठारी यानी एकट्यानंच ' प्रभात' साभाळलं. त्यामुळं या वृत्तपत्रानं अनेक चळवळी चालवल्या तरी त्याला अपेक्षित संस्थात्मक रूप आलं नाही.'

'तरुण भारत'चे संपादक वि. ना. देवधर आपल्या भाषणात म्हणाले, ' तरुण भारत' हे ध्येयवादी दैनिक असल्यानं कोणत्याही ध्येयवादी दैनिकाला सोसाव्या लागणाऱ्या अडचणी सोसतच हे दैनिक आजच्या टप्प्याला येऊन पोहोचलं आहे कै. ग. वि. केतकर. चं. प. भिशीकर, वसंतराव गीत इत्यादीनी हे रोपटं वाढवलं, यापुढंही वाचकाच्या बळावरच 'तरुण भारत'ची वाटचाल चालू राहील. '

चारही संपादकानी अशा तऱ्हेने स्वत ची मनोगतं व्यक्त केल्यावर समारंभाचे पाहुणे मोरारजीभाई देसाई याचं भाषण सुरू झालं. आपल्या नेहमीच्या शात, संथ लयीत बोलताना मोरारजीभाईंनी सागितलं–

' कोणत्याही लोकशाहीवादी राष्ट्रात वृत्तपत्रस्वातंत्र्य अत्यंत महत्त्वाचं असतं. म्हणून ते टिकविण्यासाठी शासनानं प्रयत्न केले पाहिजेत, समाजानं प्रयत्न केले पाहिजेत; पण त्यापेक्षाही वृत्तपत्रानी बलवान होऊन स्वत.चं स्वातंत्र्य टिकवल पाहिजे !

' शासन, संसद, न्यायसंस्था व वृत्तपत्रं हे देशाचे चार आधारस्तंभ असतात ', असं सागून श्री. देसाई पुढं म्हणाले, ' यापैकी न्यायसंस्था व वृत्तपत्रं यांच्याजवळ शासन व संसदेप्रमाणे सत्ता नसली तरी या दोन सत्ताधाऱ्याना योग्य मार्गावर ठेवण्याचं काम ती करत असतात. जनता पक्षाच्या राजवटीत वृत्तपत्राना अशा तऱ्हेनं स्वातंत्र्य देण्यात आलं आहे की, आता त्यांनी सावधानता बाळगल्यास कोणालाही ते हिरावून घेता येणार नाही. अर्थात यासाठी वृत्तपत्रानीही जागरूक राहिलं पाहिजे.

' जनतेचे विचार व मतं योग्य तऱ्हेनं मांडण्यासाठी वृत्तपत्रानी भीती किंवा लाज न बाळगता कार्यरत राहिल पाहिजे आणि बलवान होण्यासाठी सत्याच्या मार्गावर राहून विवेकशील आचरण ठेवलं पाहिजे. ', असं आवाहनही श्री. देसाई यानी भाषणाच्या शेवटी केलं.

एव्हाना पाच-सहा वक्त्यांची भाषणं झाली होती आणि आता अध्यक्षीय भाषणाचा उपचार होऊन समारंभ संपणार या भावनेनं अनेकाना परतण्याचे वेध लागू लागले; पण न्या. चद्रशेखर धर्माधिकारी यानी आपल्या खुमासदार भाषणातून काही मूलभूत विचार माडत समारंभाचा नूरच पालटवून टाकला. वरवर विनोदी वाटणारे किस्से सागत श्री. धर्माधिकारी यानी श्रोत्यांना काही वेळा निश्चितच अंतर्मुख व्हायला लावलं. आपल्या भाषणात ते म्हणाले–

' सामान्य माणसाची गाऱ्हाणी ऐकून घेणारी न्यायसंस्था व वृत्तपत्रं ही दोनच आशास्थानं आणि आश्रयस्थान असतात. शब्दाच्या सामर्थ्यावरच संपादकाचा विश्वास असतो, अशी सामान्य माणसाची भावना असते. म्हणून सामान्य नागरिक हा येथील विधाता आहे, विषय नाही असा दृष्टिकोन वृत्तपत्रानी ठेवला पाहिजे. त्यातूनच या नागरिकांची शक्ती वृत्तपत्रामागं उभी राहू शकेल, त्या दृष्टीनं आजच्या या समारंभातून पुणेकरांची शक्ती या चार वृत्तपत्रांमागं राहील, याची कबुलीच त्यानी दिली आहे, असं म्हणता येईल. '

न्यायालयं व वृत्तपत्रं याच्या कामामध्ये बरच साम्य असतं, असं सांगताना श्री. धर्माधिकारी म्हणाले, 'सत्याचा शोध घेत शेवटपर्यंत जाणं हे या दोघामधील एक महत्त्वाचं साम्य आहे. तसंच या दोघावर कोणाचीही सत्ता चालत नाही. निर्भयता हे सगळ्यात महत्त्वाचं कवच घेऊन या दोन सस्था सतीचं वाण चालवत असतात. कारण ' फिअर इज अ डार्करूम व्हेअर ऑल निगेटिव्हज आर डेव्हलप्ड' हे लक्षात घेऊन या सस्थाना काम करावं लागतं. '

भगवत राज्यकारभार कसा चालवत आहे हे जेव्हा मला पहायचं असतं तेव्हा मी वर्तमानपत्र उघडतो, असं प्रसिद्ध शास्त्रज्ञ न्यूटन म्हणत असे, असं सागून श्री. धर्माधिकारी म्हणाले, ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेलं वृत्त खोटं कसं असेल असं माझी आजी नेहमी म्हणत असे. यात विनोदापेक्षाही आता वेदनेचा भाग जास्त आहे, हे मी आपल्या निदर्शनाला आणू इच्छितो. '

' अन्याय सहन करण्याची सवय झालेली पिढी व ती सवय नसलेली पिढी यामुळं ' जनरेशन गॅप ' निर्माण होत असते. मी लहान असताना मी कसा होऊ, असं वडिलांना विचारलं असता म. गाधी, लो. टिळक, वल्लभभाई पटेल याचे फोटो दाखवून ते मला म्हणाले होते, याच्यापैकी कोणासारखं तरी व्हायचा प्रयत्न कर. आज माझ्या मुलाने तसाच प्रश्न विचारला तर मी म्हणतो,

' कोणासारखाही हो, पण माझ्यासारखा होऊ नकोस !' कारण मागच्या पिढीच्या हातून अमृताचा कुंभ घेऊन पुढच्या पिढीच्या हाती आम्ही जर भिकेचा कटोरा देणार असू तर आम्ही येथेच थांबावं असं मला वाटतं, पुढच्या पिढीसाठी फळं देणारे वृक्ष लावणारे आजोबा आता दिसत नाहीत, याचं आज मला जास्त दुःख होतं.'

वृत्तपत्राचं माणसाच्या आयुष्यातलं महत्त्व विशद करताना श्री. धर्माधिकारी म्हणाले, 'प्रसिद्ध घटनातज्ज्ञ जेफरसन यानं एके ठिकाणी असं म्हटलंय की, वर्तमानपत्राशिवाय सरकार की सरकारशिवाय वृत्तपत्रं, असं द्वंद्व माझ्यासमोर उभं राहिल्यास मी यातला दुसरा पर्याय स्वीकारेन.

'जीवनात स्वातंत्र्य आणि सुख किंवा आराम आणि आजादी यांच्यामध्ये कधी सौदा होऊच शकत नाही. अशा सौदाबाजीला बळी न पडणारी बिनमोल माणसं इथं निर्माण झाली, म्हणूनच इथल्या वृत्तपत्रसृष्टीनं आजचा हा टप्पा गाठला आहे.'

एकूण समारंभ जेमतेम तासभर चालला. पक्षाच्या प्रचारसभेलाही वेळ न चुकवणारे मोरारजीभाई व्यासपीठावर असल्याने सर्वच वक्ते वेळेचं भान ठेवून बोलले. त्यामुळे कार्यक्रमाला एक आटोपशीरपणा आला. अर्थात म्या. धर्माधिकारी जर नसते तर समारंभाचा दर्जा काय राहिला असता याबद्दल अनेकजण शंका व्यक्त करत होते.

एकाच शहरातल्या चार वृत्तपत्रांनी एकाच वर्षी निरनिराळी महोत्सवी वर्षं साजरी करणं हा तर एक योगायोग आहेच, पण त्या चौघांचाही एकाच व्यासपीठावर गौरव होणं ही जास्त अपवादात्मक बाब आहे. त्या दृष्टीनं या कार्यक्रमाचे संयोजक निश्चितच अभिनंदनाला पात्र आहेत; पण समितीला नाव जरी 'पुणे शहर नागरिक-सत्कार समिती' असं बरंच भारदस्त दिलं होतं तरी समारंभाच्या स्वागत समितीचे एक सदस्य एस. एम. जोशी यांच्याव्यतिरिक्त फारसं कोणीच दिसत नव्हतं.

स्वागत समितीतले बहुतेकजण तर अनुपस्थित होतेच; पण स्वतः पुण्याचे महापौर व स्थायी समितीच्या अध्यक्षांची अनुपस्थितीही विशेष जाणवणारी होती. महापालिका आयुक्तही अशा कार्यक्रमाला येणं अपेक्षित होतं; पण ही कोणीच मंडळी न आल्यानं डॉ. देसाई यांच्या वैयक्तिक धडपडीतूनच हा कार्यक्रम उभा राहिला. त्यात त्यांचं यश आहे आणि अपयशही ! ◻

## यू मस्ट अॅग्री
## वुई वाँट डिग्री

भारतातलं 'विद्यार्थ्यांचं दशक' संपून 'शेतकऱ्यांचं दशक' सुरू झालं आहे, असं अनेकजण म्हणत असतानाच देशातल्या आसाम, गुजरात, बिहार, महाराष्ट्र या राज्यामध्ये तरी विद्यार्थी–आंदोलनाचा जोर अजून ओसरलेला नाही.

आसामचं आंदोलन गेली दीड-दोन वर्षं बऱ्याच अंशी शांततामय मार्गानं विद्यार्थी चालवत आहेत. बिहार आणि गुजरातमध्ये शैक्षणिक क्षेत्रातल्या राखीव जागांवरून रक्तरंजित आंदोलनं उसळली. बिहारचं आंदोलन लवकर संपुष्टात आलं; पण गुजरातमधली आग चार महिन्यानंतरही अजून कुठं तरी धुमसतेच आहे. महाराष्ट्रात अभियांत्रिकी, कृषि आणि कला हे बऱ्याच प्रमाणात व्यावसायिक पातळीवरील अभ्यासक्रम शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी आंदोलन छेडलं. यापैकी अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांचं 'राजपत्रित अधिकाऱ्याचा दुसरा दर्जा मिळावा,' या मागणीसाठी सुरू झालेलं पुण्यातलं 'रस्ता रोको' आंदोलन लाठीमार व दगडफेकीनंतर मुख्यमंत्र्यांनी हस्तक्षेप केल्यामुळं मागणी मान्य होऊन थांबलं. कृषि व कला या दोन क्षेत्रात मात्र विद्यार्थ्यांची आंदोलनं राज्यभर चालू आहेत. फक्त या विद्यार्थ्यांचं बळ कमी पडत असल्यानं त्यांच्या मागण्यांकडे शासनानं अद्याप पुरेसं लक्ष दिलेलं नाही, आणि विद्यार्थ्यांनीही मोर्चा, निवेदनं, चक्री उपोषणं अशा सुचतील त्या मार्गांनी आपलं आंदोलन चालूच ठेवलं आहे.

त्यातही पुन्हा कला–विषयाचे विद्यार्थी पदवी–अभ्यासक्रमासाठी चालवत असलेल्या आंदोलनाचं वैशिष्ट्य असं की, त्यांच्या या मागणीला संस्थाचालकाचाही जोरदार पाठिंबा आहे. 'महाराष्ट्र फेडरेशन ऑफ आर्ट इन्स्टिटयूशन्स' या संस्थाचालकांच्या राज्यव्यापी संघटनेनं एका ठरावान्वयेच विद्यार्थ्यांच्या या मागणीवर शिक्कामोर्तब केलं आहे.

कलाविषयासाठी सध्याच्या पदविका-अभ्यासक्रमाऐवजी पदवी–अभ्यासक्रम सुरू करण्याची विद्यार्थ्यांची मागणी रास्त आहे, हे शासनाच्याही कृतीवरून दिसून येतं. कारण मुंबईचं जे. जे. स्कूल ऑफ आर्ट आणि औरंगाबादच्या शासकीय कला-विद्यालयामध्ये या मागणीला मान्यता मिळाली आहे. पुण्यामधल्या 'अभिनव कला विद्यालय'सारख्या अशासकीय कलासंस्थामध्येही पदवी–अभ्यासक्रम सुरू करावा, हे शासनाला तत्त्वतः मान्य आहे, असं दिसतं. कारण पदवी-अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी आवश्यक पावलं उचलण्याच्या सूचना पुणे विद्यापीठाकडे शासनानं यापूर्वीच पाठवल्या आहेत; पण विद्यापीठाच्या नेहमीच्या कार्यपद्धतीनुसार या सूचनांची अंमलबजावणी करायचं ठरवल्यास सर्व तांत्रिक बाबी पूर्ण करून कलासंस्थामध्ये पदवी–अभ्यासक्रम सुरू करण्यास व अशा अशासकीय कलासंस्था

मलपृष्ठ १ वर


**प्रसिद्ध झाले.**

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे
प्रेरणादायी चरित्र

**एक होता कार्व्हर**

लेखिका : सौ. वीणा गवाणकर

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ३०

मूल्य : रुपये पंधरा

# बुद्धिप्रामाण्यवाद–काही गैरसमजुती

डॉ. शरद अभ्यंकर, वाई

गेल्या अनेक वर्षांचा, विशेषतः गेल्या वर्षी पुण्यात भरलेल्या बुद्धिप्रामाण्यवादी मेळाव्यापासूनचा माझा अनुभव आहे की, मी बुद्धिप्रामाण्यवादी किंवा काही लोक म्हणतात तसा नास्तिक आहे, हे समजल्याबरोबर लोक माझ्याकडे मी एखादा मंगळावरून आलेला तीन पायांचा प्राणी असावा अशा नजरेने पाहू लागतात. काही वेळा असे घडते की, मी बुद्धिप्रामाण्यवादी असल्याचा शोध संभाषणाच्या ओघात मी काढलेल्या एखाद्या उद्‌गारामुळे ऐकणाऱ्याला लागतो. लगेच तो सूर पालटतो आणि एखादी शिवी द्यावी तसा 'म्हणजे तुम्ही 'नास्तिक' आहात तर!' असा शेरा मारतो. बायका तर उघडउघड मला टाळतात. त्यांच्या मते बुद्धिप्रामाण्यवादी हा बलात्कारवाद्यापेक्षा जरा खालच्याच दर्जाचा!

एकदा नोकरीकरता चाललेल्या मुलाखतीत मला विचारले गेले, तुमचा धर्म कुठला? (कारण अर्जाच्या मसुद्यात मी 'धर्म' या कलमापुढे 'मानव' असे लिहिले होते.) तेच उत्तर मी दिले. 'नाही, म्हणजे तुमची जात?' 'धर्म-होमो, जात-सॅपिएन्स, उपजात-वैद्यकीय पदवीधर' असे उत्तर द्यायचे माझ्या मनात होते; पण नोकरी मिळणे आवश्यक होते, म्हणून मी गप्प राहिलो. 'नावावरून हिंदू ब्राह्मण वाटता. होय ना?' साहेबांनी विचारले. 'तो काही माझा गुन्हा नाही. सर, अगदीच अजाणता घडलेली गोष्ट आहे ती.' साहेबांना हा उद्धटपणा वाटला असावा. कारण मला नोकरी मिळाली नाहीच.

तर मुद्दा हा की, वरील दोन गैरसमज बुद्धिप्रामाण्यवादी मंडळींच्याबद्दल सर्वत्र सदैव आढळतात. १. यांच्यापाशी नैतिक मूल्ये अशी नसतातच आणि २. स्वजातीचा अथवा धर्माचा यांना अभिमान नसतो. आता आपण सत्य परिस्थिती काय आहे ते पाहू या.

जरा उघडया डोळ्यांनी सभोवताली पाहिलेत तर असे शेकडो नव्हे हजारो लोक दिसतील की, जे श्रद्धावान आहेत, देवावर विश्वास ठेवणारे आहेत, रोज देवपूजा करणारे आहेत, देवळात, चर्चमध्ये व मशिदीत नेमाने जाणारे आहेत, दरवर्षी तीर्थयात्रा करणारे आहेत, कुणा तरी बाबा वा भगवानाची भक्ती करणारे आहेत, सर्व काही करणारे आहेत; पण त्याचबरोबर हेच लोक निर्लज्जपणे काळा बाजार, साठेबाजी, नफेखोरी, भेसळखोरी, चोरटा व्यापार, लाच घेणे, लाच देणे, विवाहबाह्य संबंध ठेवणे–थोडक्यात अ पासून ज्ञ पर्यंत सर्व प्रकारचे अनैतिक व्यवहार राजरोस करत असतात. फार काय अशा तऱ्हेच्या लाडया–लबाडया करून संपत्ती कमवायची आणि मग आपले पाप धुतले जाईल या आशेने त्यातला काही हिस्सा 'देव-धर्मा'खातर खर्च करायचा ही आपल्याकडची रहाटीच आहे.

एखाद्या माणसाची धार्मिक श्रद्धा (वा अश्रद्धा) याचा आणि त्याच्या नीतिमत्तेचा वा गुन्हेगारी प्रवृत्तीचा काहीही संबंध नाही' याचा आकडेशास्त्रीय पुरावा मी देऊ शकतो. सुप्रसिद्ध विधिज्ञ आणि लेखक फ्रँक स्वॅन्कारा यांनी अनेक देशातील धार्मिक श्रद्धा आणि गुन्हेगारी प्रवृत्ती याचा अभ्यास केला आहे. अमेरिकेतील सिंगसिंग या तुरुंगात दहा वर्षांच्या कालावधीत खुनासाठी देहांताची सजा झालेल्यांपैकी ६५% होते रोमन कॅथॉलिक, २६% प्रॉटेस्टंट, ६% ज्यू, २% इतर आणि १/३% पेक्षा कमी होते धर्म न मानणारे!

आता आपण दुसऱ्या आक्षेपाकडे वळू. तो म्हणजे–'ज्या जातीत वा धर्मात तुम्ही जन्म घेतलात त्याबद्दल थोडाही अभिमान तुम्ही बाळगत नाही!' या आरोपातच त्याचे खंडन आहे. या गोष्टींबद्दल ज्यांना जबरदस्त अभिमान वाटतो अशी बहुतेक सर्व मंडळी, दुसऱ्या एखाद्या जातीत वा धर्मात जन्माला आली असती तर त्याबद्दलही त्यांना तितकाच कडक अभिमान वाटला असता! ज्याच्यावर आपले नियंत्रण काहीच नाही अशा गोष्टींबद्दल आंधळेपणाने अभिमान वाटणे योग्य की, खुल्या मनाने, नि:पक्षपातीपणाने विचार करून काढलेल्या सुस्पष्ट आणि तर्कसंगत निष्कर्षाबद्दल अभिमान बाळगणे योग्य?

आणखी एक आक्षेप असा की, 'हा नास्तिकवाद आणि बुद्धिप्रामाण्यवाद म्हणजे उगीच परदेशी लोकांची (म्हणजे इंग्लंड, अमेरिका) नक्कल करून काढलेली फ्याडं हो!! त्याउलट तेवढेच लोक अशा ठाम मताचे असतात की, 'हे सगळं कम्युनिझमचं तत्त्वज्ञान. कार्ल मार्क्स म्हणतो देव नाही, की हे लागले नाचायला देव नाही म्हणून!' हे दोन्ही आरोप निखालस चुकीचे आहेत. कदाचित सर्व बुद्धिप्रामाण्यवाद्यांनाही ठाऊक नसेल की, भारतात या विचारांची हजारो वर्षांची परंपरा आहे. भारतीय तत्त्वज्ञानाचा आत्मा असा जो 'आत्मा' त्यालाच अनेक विद्वान विचारवंत ऋषींनी आव्हान दिले आहे! लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, 'मरणोत्तर आत्मा आहे असे म्हणणारे भ्रमात राहतात असे मानणारी काही माणसे वेदकाळापासून आतापर्यंत झालेली दिसतात. त्या माणसांमध्ये बृहस्पती, चार्वाक, विरोचन असुर (छांदोग्य उपनिषद) कणिक भारद्वाज (कौटिलीय अर्थशास्त्र व महाभारत) भागुरी (व्याकरण महाभाष्य), अजित केशकंबळी (त्रिपिटक) इत्यादी तत्त्वज्ञ अतिप्राचीन काळी भारतात आणि ग्रीस, रोम इ. देशात होऊन गेले. अलीकडे युरोप, अमेरिका इत्यादी पश्चिमी देशात व भारतात गेल्या दोनशे वर्षांपेक्षा अधिक कालावधीत होत आहेत. त्यात शाश्वत नीतितत्त्वाचे समर्थन करणारे मानवतावादी पुष्कळच आहेत. भार-

पृष्ठ २१ वर

# पोलंड

## कम्युनिस्ट पक्षातच संघर्ष

वा. दा. रानडे

पोलंडमध्ये रशिया सध्या तरी हस्तक्षेप करण्याची शक्यता दिसत नाही. पंधरा दिवसापूर्वी सीमेवर वॉर्सा करार राष्ट्रांच्या फौजा जमा झाल्या होत्या; पण त्या परत फिरल्या. पोलंडचा प्रश्न तेथील कम्युनिस्ट पक्ष सोडवील, असे रशियाचे नेते ब्रेझनेव्ह यांनी प्राग येथे चेक कम्युनिस्ट पक्षाच्या काँग्रेसपुढे बोलताना सांगितले. फौजाची जमवाजमव हा एक प्रकारचा इशारा होता. तो 'सॉलिडॅरिटी' या स्वतंत्र कामगाराच्या संघटनेला होता, तसाच पोलिश कम्युनिस्ट पक्षालाही होता. रशियाच्या संभाव्य हस्तक्षेपाविरुद्ध अमेरिकेनेही ब्रेझनेव्ह याना इशारा दिला. रशिया पोलंडमध्ये हस्तक्षेप करणार, असा प्रचार पाश्चात्य राष्ट्रे करीत आहेत. रशियाला तसे काही करण्याची आवश्यकताच नाही. पोलंडचे कम्युनिस्ट नेते त्याचे प्रश्न सोडविण्यास समर्थ आहेत, अशी प्रतिमा ब्रेझनेव्ह यानी जगापुढे निर्माण केली. दरम्यान पोलंडमध्ये संपाला दोन महिने बंदी करणारे बिल तेथील पार्लमेंटने पास केले. 'सॉलिडॅरिटी'ची चळवळ दडपण्यासाठी टाकलेले हे पाऊल आहे, अशी प्रतिक्रिया त्यावर व्यक्त करण्यात आली. संपबंदी करण्याचा पार्लमेंटला अधिकार आहे हे आम्हाला मान्य नाही, असे 'सॉलिडॅरिटी'चे नेते म्हणत असले तरी पार्लमेंटच्या या निर्णयाला त्यानी पुन्हा संप करून विरोध दर्शविलेला नाही हेही लक्षात घेतले पाहिजे. स्वतंत्र शेतकरी संघटना कायद्याची 'सॉलिडॅरिटी'ची मागणीही मान्य झाली आहे.

'सॉलिडॅरिटी'च्या लढ्याची पुढची पावले कोणती असणार? या संघटनेत आपले लोक घुसवून ती आपल्या ताब्यात आणण्याचा कम्युनिस्ट पक्षाने प्रयत्न केला; पण त्यात यश आले नाही. उलट आपल्या ताब्यात कम्युनिस्ट पक्ष आणण्यासाठी 'सॉलिडॅरिटी'नेच प्रयत्न चालविले आहेत. पक्षाच्या तीस लाख सभासदापैकी दहा लाख 'सॉलिडॅरिटी'च्या बाजूचे आहेत. त्याची सख्या वाढत आहे. पक्षाची काँग्रेस येत्या २० जुलैला भरणार आहे. या काँग्रेसचे निम्मे प्रतिनिधी गुप्त मतदानाने निवडण्यात यावेत ही 'सॉलिडॅरिटी'ची मागणी पक्षनेत्याना मान्य करावी लागली 'सॉलिडॅरिटी'ने पक्षात आपल्या बाजूच्या सभासदाचे गट संघटित केले असून त्यांच्या हालचालीतही एकसूत्रता आणण्याचे प्रयत्न चालू आहेत. झेझेसिन, गान्स्क, टोरिन, रॉक्लॉ येथे तर त्यानी गुप्त मतदानाने सध्याचे पदाधिकारी दूर करून त्या जागी आपल्या बाजूचे पदाधिकारी निवडले आहेत. पक्षाच्या काँग्रेससाठी कार्यक्रमपत्रिका तयार करण्याकरता त्यानी स्वत ची कमिशने नेमली आहेत.

यासबंधात वोरुनचे उदाहरण लक्षात घेण्यासारखे आहे. तेथे गेल्या उन्हाळ्यात सिगन्यू इवानो या तरुण इंजिनिअरच्या नेतृत्वाखाली संप झाला गेली दहा वर्षे ते कम्युनिस्ट पक्षाचे सभासद आहेत. संपातील त्याचे कार्य लक्षात घेऊन स्थानिक पक्ष शाखेने त्याना पहिला सेक्रेटरी निवडले. पक्षाच्या मध्यवर्ती समितीने त्याना सेक्रेटरीपदावरून काढून टाकले; पण स्थानिक शाखेने पुन्हा त्यांना सेक्रेटरी निवडले. सेंट्रल कंट्रोल कमिशनने त्याना पक्षातून बडतर्फ केले; पण स्थानिक शाखेने हा निर्णय मानण्याचे नाकारले.

कम्युनिस्ट राजवटीत कम्युनिस्ट पक्षाचा नेता आणि पॉलिट ब्यूरो याच्या हातीच सर्व सत्ता केंद्रित झालेली असते. सरकारचे स्थान दुय्यम असते. त्याने फक्त पक्षाने घेतलेल्या निर्णयावर शिक्कामोर्तब करावयाचे. पोलंडमध्ये 'सॉलिडॅरिटी'ने घडवून आणलेला आणखी एक महत्त्वाचा बदल म्हणजे कम्युनिस्ट पक्षाचे महत्त्व कमी होऊन सरकारचे महत्त्व वाढत आहे. सरकार आणि 'सॉलिडॅरिटी'. याच्यात मध्यस्थाची भूमिका कम्युनिस्ट पक्षाने घ्यावी, अशी सूचना नुकत्याच झालेल्या एका बैठकीत समाजशास्त्रज्ञ मार्किलिझ यांनी केली. पक्षाला दुय्यम स्थान देणाऱ्या अशा सूचना लागलीच मान्य होतील असे नाही; पण बदलत्या मतप्रवाहाची कल्पना त्यावरून येते.

शेकडो पक्षसभामधून मध्यवर्ती समिती, पोलिटब्युरो व सध्याचे पक्षप्रमुख कानिया यांच्या नेतृत्वावर उघड टीका सर्वसामान्य सभासद करू लागले आहेत. कानिया यांच्या नेतृत्वासंबंधी बोलताना गान्स्क येथील पक्षशाखेचे पहिले सेक्रेटरी नुकतेच म्हणाले, "नेतृत्वाची कृती आमच्या अपेक्षापेक्षा एवढी निराळी होती की ते जणू आमचा पक्ष चालवीत नसून निराळाच पक्ष चालवीत आहेत असे वाटत होते.' पक्षनेतृत्वाची सर्वसामान्य समासदापासून झालेली फारकत हे पोलडमधील आजच्या पेचप्रसंगाचे मूळ आहे. 'सॉलिडॅरिटी'ची चळवळ प्रतिगामी आहे, कम्युनिस्ट समाजपद्धती नष्ट करून त्यांना पाश्चात्य राष्ट्रांच्या मदतीने भांडवलशाही आणावयाची आहे, अशी प्रचारमोहीम 'सॉलिडॅरिटी' विरुद्ध रशियन वृत्तपत्रातून नेहमी होत असते. आपल्या विरोधकाना प्रतिगामी, प्रतिक्रांतिकारक, भांडवलदारांचे हस्तक अशी शेलकी विशेषणे लावण्याची ही कम्युनिस्टाची नेहमीचीच कार्यपद्धती आहे. कम्युनिस्ट विचारप्रणाली मान्य करणाऱ्यामध्ये सुद्धा धोरणाबाबत प्रामाणिक मतभेद असू शकतात, हे मान्य करण्याची त्यांची तयारी नाही. जेव्हा असे मतभेद होतात तेव्हा लोकशाही पद्धतीने बहुमताने निर्णय घेणे हाच मार्ग अवलंबावयास हवा. कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यपद्धतीत लोकशाही आणण्यासाठी 'सॉलिडॅरिटी'चा लढा आहे आपलेच धोरण बरोबर, बहुसंख्य सभासद आपल्यामागे आहेत अशी सध्याच्या नेतृत्वाची खात्री असेल तर 'सॉलिडॅरिटी'च्या विरोधाची एवढी भीती त्यांनी का बाळगावी? भांडवलदारी देशात कम्युनिस्ट चळवळ दडपून टाकण्यासाठी दडपशाही केली जाते, अशी टीका कम्युनिस्ट नेहमी करीत असतात; पण कम्युनिस्ट देशातील सत्ताधारी आपल्या विरोधकाविरुद्ध कोणत्या पद्धतीने वागतात? भांडवलदारी देशात निरनिराळ्या विचारप्रणालीवर अधिष्ठित पक्ष तरी अस्तित्वात असतात. कम्युनिस्ट देशात कम्युनिस्ट पक्षाशिवाय इतर पक्षाना वावच नसतो आणि कम्युनिस्ट पक्षातही लोकशाही कार्यपद्धती नसते. खालच्या तळशाखेपासून वरपर्यंत विचारविनिमय होऊन बहुमताने निर्णय ठरत नाहीत. वरिष्ठ नेते निर्णय घेतात आणि खालच्या शाखा ते निमूटपणे मान्य करतात. टीका झालीच तर धोरणाच्या अंमलबजावणीतील चुकावर, दोषांवर होते. मूळ धोरणावर होत नाही. वृत्तपत्रातील टीकेचे स्वरूपही असेच असते. मार्क्स–लेनिनच्या काळात सुरुवातीला लोकशाही मध्यवर्तित्वाच्या तत्त्वानुसार काम चालत असेल, टीका–आत्मटीकाही होत असेल, आजही या तत्त्वाचा उद्घोष केला जातो; पण प्रत्यक्षात कार्य त्या पद्धतीचे होत नाही.

कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यपद्धतीत सुधारणा घडवून आणणे हा 'सॉलिडॅरिटी'च्या लढ्याचा एक उद्देश आहे. येत्या जुलैतील काँग्रेसमध्ये पक्षाची सूत्रे आपल्या हाती आणण्यात 'सॉलिडॅरिटी'ला यश आले तर कम्युनिस्टपद्धतीलाच धोका निर्माण झाला असे मानून रशिया लष्करी हस्तक्षेप करील काय? जुलैनंतरच याचे उत्तर देता येईल. रशिया हस्तक्षेप करो किंवा न करो, पोलंडमधील आजचा हा संघर्ष, जगातील, विशेषतः पूर्व-युरोपातील कम्युनिस्ट चळवळीवर दूरगामी परिणाम करणारा ठरेल. □

## उत्तर मीमांसा : २ :

स. शि. भावे

# विधायकता : नित्य आणि नैमित्तिक

आज-काल 'विधायक' शब्दाला विशेष महत्त्व आलेले दिसते आहे. वसंतदादांसारखे नेते राजकारण सोडून विधायक काम हाती घेण्याची भाषा करीत आहेत. (म्हणजे राजकारण हे विधायक काम नव्हे तर! आणि हे मत एक मुरब्बी आणि मातबर राजकारणी व्यक्ती जाहीर करीत आहे!) विरोधी पक्षानी विरोध करावा; पण तो विधायक भूमिकेवरून करावा, असे आवाहन पंतप्रधान करीत आहेत. आसामी विद्यार्थ्यांनी आंदोलन संपवावे, कारण त्याने राष्ट्रविकासाची विधायक कामे मोडतात, अडतात असे आवाहन त्यांना उद्देशून केले जात आहे. एकूण समाजाची, विशेषत: विद्यार्थ्यांची विधायक प्रवृत्ती अलीकडे फार कमी झाली आहे अशी टीका कमी-अधिक प्रमाणात, बहुतेक सामाजिक धुरीण करीत आहेत.

समाजातल्या काही क्षेत्राचे वर्णन 'विधायक' असे निखालसपणे आजवर केले जात असे. शिक्षण-अध्यापन, वैद्यकीय मदत-मार्गदर्शन, समाजाची, त्यातील कमकुवत घटकांची सेवा—ही क्षेत्रे निर्विवाद विधायक क्षेत्रे म्हणून सर्वमान्य होती. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे कार्य विधायक होते याविषयी दुमत नव्हते. गावोगावच्या प्रख्यात डॉक्टर-वैद्याकडे 'अर्ध्या रात्री हक्काने जावे' असे विश्वासाचे उद्‌गार परवापरवापर्यंत निघत असत. डॉ. शिवाजीराव पटवर्धनांचे कुष्ठरोगनिवारणाचे कार्य विधायक आहे याविषयी अगदी संशयी स्वभावाच्या मनात देखील शंका नसे.

हल्ली मात्र 'विधायक' कार्याला लोकाकडून इतक्या विश्वासाने मान व मान्यता मिळत नाही. अध्यापक, वैद्यक आता व्यवसाय झाले आहेत आणि नवी व्यावसायिक वृत्तीही त्यात रुळली आहे. समाजकार्यकर्त्यांच्या 'विधायक' वृत्तीविषयीही तुमच्या-आमच्यासारख्यांच्या मनात संशय असतोच; पण उघड कसे बोलावे, म्हणून बहुतेक गप्प बसतात, इतकेच.

स्वातंत्र्यानंतर एक महत्त्वाचा फरक झाला. 'विधायक' कार्यकर्ते पूर्ण वेतन घेऊ लागले. अनेक महान व्यक्तीच्या माहात्म्याने जे विश्वस्त निधी उभारले गेले त्या निधीतून अशा कार्यकर्त्यांना वेतन, कार्यालये, राहण्यासाठी घरे, क्वचित वाहने किंवा विमानप्रवासाचे भाडे मिळू लागले. भूदानचळवळीतही पूर्ण वेळ सवेतन कार्यकर्ते होते. पूर्वीचे निर्वेतन किंवा अर्धवेतन कार्य करणाराचा जसा दरारा वाटे तसा सवेतन कार्य करणारांचा वाटेनासा झाला. हे बरे नव्हे, अशी रुखरुखच मनात ठसठसत राहिली.

वास्तविक, पूर्ण वेळच्या कार्याचे पूर्ण वेतन घेणे यात तसे वावगे काहीच नाही. आज शिक्षक-प्राध्यापक वेतनवाढही मोकळेपणाने मागतात. डॉक्टराच्या फिया त्यांच्या एकूण खर्चावर आणि दर्जावर अवलंबून असतात. आपले निरनिराळ्या पातळ्यावरचे लोकप्रतिनिधी वेतन घेतात. या वेतनात आणि सुविधांत नुकतीच झाली तशा वाढीही होत आहेत. दहा हजार किलोमीटराची सवलत पंधरा हजार किलोमीटरांपर्यंत लांबली आहे, सहचारिणीबरोबर दोन अज्ञान मुलेही या सवलतीत हक्काने समाविष्ट झाली आहेत.

हे सारे स्वाभाविक आहे, सामान्य मनुष्यस्वभावाला धरून आहे. जे आपल्या हक्काचे ते आपल्या बायको-मुलाच्याही हक्काचे असावे असे माणूस म्हटले की वाटतेच. इतर कोणी, विशेषत: इतर पक्षातील कोणी, असा 'वारसा-हक्क' सांगितला तर तसे करणे आवडत नाही खरे; पण तेही स्वाभाविकच. 'आ. तो बा. दु. ते का.' (आपला तो बाळ्या, दुसऱ्याचं ते कार्टं) हा प्राणिसहज न्याय आहे. येथे हा हक्क स्वकष्टाचा, तो हक्क प्रतिनिधित्वाचा, असा सूक्ष्म विवेक होत नाही; पण हेही स्वाभाविकच म्हणावे लागेल.

तर मुद्दा हा की, पूर्ण वेळ कार्यकर्त्याने पूर्ण वेतन घेण्यात वावगे काहीही नाही. समाजाने कार्यकर्त्याला कसलीही विवंचना ठेवू—उरवू नये. उलटपक्षी, कार्यकर्त्याने आपले सर्व सामर्थ्य, आपली सर्व गुणवत्ता, पूर्ण वेळ कार्याकडेच खर्ची घालावी, हीच उचित व्यवस्था म्हणावी लागेल.

पण आढळते असे की, काळ बदलला तरी मनाच्या जुन्या सवयी मात्र तशाच मनाला चिकटून राहतात. विधायक कार्यासाठी 'त्याग' केला असे दिसले किंवा मोठे 'साहस' केले असे दिसले की ते 'विधायक', 'अधिक विधायक' वाटू लागते. त्याग आणि साहस करणाऱ्या अशा कार्यकर्त्यामागे एक तेजोवलय उभे राहते. त्या तेजोवलयाचे तेज त्याच्या कार्यालाही लाभते. सर्व समाजातील सुप्त तेज जणू अशा असामान्य व्यक्तीत एकवटून प्रगटले आहे असा आत्मगौरवाचा अनुभव, अशा व्यक्तीच्या बाबत समाजाला येतो. समाज त्याना विभूती मानू लागतो. लोकमान्य, महात्माजी या आपल्या अशा समकालीन विभूती.

यांच्या पठडीतील, पण आपल्या कार्याचे क्षेत्र मर्यादित ठेवणारी अशी एक विभूती म्हणजे बाबा आमटे. बाबांचे हे विभूतिमत्व खरवडून काढण्याचा प्रयत्न मुकाताच झाला. असा प्रयत्न करण्यास हरकत घेण्याचे काहीच कारण नाही. किंबहुना, ज्यास असे खरवडावेसे वाटत असेल त्यास पूर्ण संरक्षण व संधी मिळावी हेच निकोपपणाचे लक्षण होय. अशा परीक्षातूनच अस्सल कोणते व हिणकस कोणते याचा निकाल होत आलेला आहे. तेव्हा बाबांच्या बाबतीत असा प्रयत्न कोणी केला तर त्यास तो करू दे. आनंदाची गोष्ट अशी की आजवरच्या त्यांच्या रिवाजाप्रमाणे याही आक्षेपाना बाबानी खरे, रोखठोक उत्तर दिले. आक्षेप लटके पडले, बाबा उजळून निघाले!

भावाचा त्याग आणि कुष्ठरोगात सहकुटुंब उडी घेण्याची त्याची धडाडी यांनी त्यांच्या विधायक कार्याला जे तेज प्राप्त करून दिले आहे, त्यातून विधायकतेच्या काही छटांचा आणि पायऱ्यांचा पत्ता लागतो.

खरे म्हणजे जीवनाला उपयोगी असे कोणतेही कार्य विधायकच म्हणायला हवे. स्वपोषण आणि स्वकीयांचे पोषण हे विधायकच नाही का? स्वजातीय, स्वधर्मीय, स्वदेशीय यांचे कार्य म्हणजे विधायक कार्यच नव्हे का? पण मनाचा भाव असा असतो की, जसजसे कार्य 'स्व'पासून दूर जाते तसतसे जास्तजास्त समाधानाने ते विधायक वाटते. बहुधा असे वाटत असावे की, स्वकीयांच्या गरजेचे काय, कोणी झाले तरी बघणारच; पण परक्यांच्या गरजेचे बघायचे तर मात्र अंगात खरा सज्जनपणा पाहिजे.

याच दिशेने जाता, मर्यादित क्षेत्रापेक्षा व्यापक क्षेत्राची पायरी वरची मानली जाते. स्थानिक नेत्यापेक्षा राष्ट्रीय नेता मोठा मानला जातो; पण संतमहात्मे, धर्मसंस्थापक यांना सर्वांत वरची पायरी दिली जाते. कारण त्यांची विधायकता सर्वांसाठी असते.

यात आणखी एक महत्त्वाचा फाटा असतो. अपंगांसाठी, रोगग्रस्तांसाठी चाललेल्या कामाला विशेष मानाचे स्थान मिळते. गंमत पहा. आपण प्रत्यक्षपणे त्यांच्यासाठी काही करीत नाही. अशा रोगग्रस्तांपासून हातभर दूरच राहतो; पण जे यांच्यासाठी काही करतात त्यांना मात्र आपण मोठा मान देतो, त्यांच्यासंबंधी मोठा पूज्यभाव मनात बाळगतो. जे आपणास जमले नाही व बहुधा कधीही जमणार नाही अशी आपली खात्री असते, ते ज्यांना जमले त्यांच्यातील असामान्य गुणवत्तेचा हा उत्स्फूर्त गौरव असतो. बाबा आमटे यांना आज प्राप्त झालेला विभूतिमत्त्वाचा गौरव हा या जातीचा आहे.

विधायक काम करणाऱ्याची नि:स्वार्थी वृत्ती, कार्यक्षेत्राची व्यापकता, त्या कार्याचा टिकाऊपणा यावर जशी विधायकतेची प्रत आपण ठरवतो, तशीच किंवा त्यापेक्षाही जास्त त्या कार्याच्या वैचारिक-तात्त्विक भूमिकेवरून आपण ठरवतो. मूलभूत विचार, नवे तत्त्व शोधणे, ते सर्व अंगोपांगास प्रस्थापित करणे हे काम म्हणजे सर्वांत महत्त्वाचे विधायक कार्य आहे, याची खात्री आपल्याला मनोमन पटलेली असते. डार्विन, मार्क्स, फ्रॉइड, महात्माजी यांचा किंवा आद्य शंकराचार्यांचा गौरव आपण मनात जोपासतो तो या बुद्धीने. मानवी बुद्धी आणि नवनिर्माणक प्रतिमा ही सर्वांत महत्त्वाची, आणि म्हणून, बुद्धीच्या प्रतिभेच्या क्षेत्रातील विधायक काम हे खरे महत्त्वाचे विधायक काम, अशी अचूक धारणा आपल्या मनात माणूस म्हणूनच सहजपणाने असते. अशा तत्त्वजिज्ञासू महामानवांना रूढ लोकप्रियता मिळत नाही; पण त्यांचे गौरवादराचे स्थान अबाधित राहते.

विधायकतेची महान यात्रा जगाच्या सुरुवातीपासून, उत्क्रांतिक्रमाच्या रूपाने चालू आहे. या विधायक विधायकतेत निषेधक विधायकतेचे फार महत्त्वाचे कार्य आणि स्थान असते.

निर्जीव झालेल्या प्रस्थापितविरुद्ध बंड हे या निषेधक विधायकतेचे पायाभूत रूप आहे. विधायकता जिवंत आणि प्रवाही राहावी, टिकाऊ बनता बनता तिची निर्जीव प्रस्थापित चौकट होऊ नये यासाठी अशी निर्भय बंडे सर्व काळी, सर्व क्षेत्रांत, सर्व पातळ्यांवर आवश्यक असतात. प्रस्थापित विचार, प्रस्थापित रूढी व आचार, प्रस्थापित बंधने यांविरुद्ध नवी तात्त्विक भूमिका घेऊन उभे राहणे ही विधायकतेची, उत्क्रांतिक्रमाला आवश्यक अशा विधायकतेची गरज आहे, अट आहे. सर्वंकष राजकीय सत्तेला कडवा विरोध करून प्रसंगी फास गळ्यात घेणे हे अशा बंडांचे एका टोकाचे विकट रूप असेल, तर वरिष्ठांनी केलेल्या मचूळ विनोदाला बारीकसेही न हसण्याचे धैर्य दाखविणे हे दुसऱ्या टोकाचे सूक्ष्म रूप असेल. बंड म्हणून दोन्ही रूपांचे महत्त्व सारखेच.

किंबहुना सूक्ष्म पाहू गेले तर, छोट्या बंडांचे महत्त्व जास्तच आहे हे सहज पटेल. मोठे बंड हे एकदा-दोनदा करावे लागते. त्याचा मोठा टिळा लागतो. त्याचे श्रेय आणि क्वचित प्रेयही नंतर मिळत राहते. एखाद्या मोठ्या नैमित्तिक व्रतासारखे किंवा उत्सवासारखे हे मोठे बंड असते. उत्साहाचे मोठेथोरले अवसान एकदाच आणले की पुरते.

छोटी बंडे मात्र नित्यकर्मासारखी असतात. त्यांचा टिळा लागत नाही की बोलबाला होत नाही ती न करणे हे पाप असते. पण करणे हे पुण्य नसते. त्यांचा उत्साह सातत्याने टिकवावा लागतो. आणि इतके सारे समजून-उमजून अशी बंडे करीत राहिले तर त्यांचे प्रायश्चित्त मात्र 'आत्ता' 'इथे' तयार असते. एखाद्या सोल्झेनित्सिनची कड घेऊन सोविएत महासत्तेविरुद्ध परखड पत्रके काढणे. तसे सोपे असते. कारण आपले वाकडे करण्याइतके महत्त्व ती महासत्ता आपल्याला देत नाही; पण यदुनाथ थत्त्यांच्या निर्भयतेचे महत्त्व जाणून तिच्यामागे जाहीरपणे उभे राहणे कठीण असते. कारण आपल्याला प्रत्यक्ष चटके बसण्याची खात्री त्यात असते तात्त्विक भूमिकेसाठी स्टालिनबरोबर आणि संपादकीय स्वातंत्र्यासाठी मालकांबरोबर, असा दुहेरी प्रतिकार एकाच वेळी करणारे प्रभाकर पाध्ये एखादेच !

म्हणून, केवळ साहित्य आणि संस्कृती हे क्षेत्र पाहिले तर ज्ञानेश्वर, रामदास, तुकाराम केशवसुत, मर्ढेकर यांच्या मोठ्या बंडांत जी विधायकतेची प्रत असते, तीच प्रत, एखादे महेश एलकुंचवार, बाहेरची कसलीही प्रेरणा नसताना, पारितोषिकासाठी पुस्तक न पाठवण्याचा निर्णय घेतात तेव्हा त्यांच्या निर्णयात किंवा एखादे देवीदास बागूल स्व-त्वरक्षणासाठी हजारो रुपये सहज धैर्याने बाजूस सारतात तेव्हा त्यांच्या निर्णयात असते. मात्र बडी बंडे जशी गाजतात तशी ही बंडे गाजत मात्र नाहीत.

माझ्या मनाचे हे एक दुःख आहे. विधायक असो, निषेधक असो, विधायकतेची अशी छोटी रूपे आपल्या नजरेत ठसत नाहीत हे खरे. अनेकदा या छोट्या रूपांना बऱ्याच मर्यादा पडलेल्या असतात हे खरे. कधी त्यातला 'स्व' व्हावा तितका दूर झालेला नसतो, कधी त्याचे क्षेत्र मर्यादित असते, कधी ते तात्कालिक असते. पण या मर्यादा बाजूस सारून अशा विधायक कृतीचे सत्त्व जाणणे शक्य असते; पण आपण तितक्या साक्षेपाने हे सत्त्व लक्षात घेतोच असे नाही, आणि लक्षात घेतले तरी गौरवतोच असे नाही. साधारणपणे 'चमत्काराशिवाय नमस्कार नाही' अशी आपली वृत्ती असते. अर्थात, चमत्कार तितकाच मोठा असल्याशिवाय नमस्कारही मोठा मिळत नाही.

मला मात्र नेहमी वाटते की,हे बदलायला

हवे. छोट्या छोट्या रूपातील विधायकता आपल्याला ओळखता यायला पाहिजे. त्या त्या रूपातील विधायकतेचा रास्त गौरव आपल्या मनात जाणवला पाहिजे. आधी म्हटले त्याप्रमाणे ही छोटी विधायकता अधिक दुष्कर असते. त्यातही, छोट्या बंडापेक्षा छोट्या छोट्या नियमनातील नित्य विधायकता अधिक दुष्कर असते.

समाजात अनेकांकडून ही नित्य विधायकता इतक्या सहजपणे घडत असते की, तशी ती घडते आहे याची वेगळी जाणीव आपणाला राहत नाही. कपडे न फाडता धुऊन, शिवणीवर हलकेच इस्त्री फिरवणारा दक्ष परीट, उन्हा-पावसात तळपत-भिजत बिनचूक टपाल वाटणारा पोस्टमन, पुण्याच्या गर्दीत आटघापाट्या खेळणाऱ्या इतर वाहनांतून स्थितप्रज्ञतेने वाट काढणारा पी. एम. टी. चा चालक, टेबलावरच्या साऱ्या फायली ज्या त्या दिवशी निकालात काढणारा साक्षेपी कारकून, शिकविण्यापूर्वी विषयाची तयारी करणारा विद्याव्रती अध्यापक यांच्या नित्यकर्मातील आणि नित्यक्रमातील विधायकतेची जाणीव जशी असावी तशी असत नाही. फार सहजपणाने आपण हे सारे गृहीत धरतो आणि त्यात खड पडला तर कातवारतो, वैतागतो, पत्रे लिहितो.

पण आपण हे ध्यानात घ्यायला हवे आहे की, या नित्यक्रमाच्या विधायकतेवर समाजाचा गाडा चालला आहे. एक वेळ बडी विधायकता नसेल तर दहा-पंधरा वर्षे थाबता येईल. पण या छोट्या नित्य विधायकतेखेरीज आपले घटकाभरही चालायचे नाही; पण या विधायकतेचे महत्त्व जाणून आपण वागत नाही. हवा जशी आपण गृहीत धरतो तशी ही विधायकतादेखील गृहीत धरतो. आणि हवा नसल्यावरच जशी ती जाणवावी तशी ही विधायकताही जेव्हा नसते तेव्हाच जाणवते. आपली दक्षता अशी कमी पडते. मग जसे हवेचे, तसे या विधायकतेचे प्रदूषणही वाढत जाते. विधायकतेचा प्राणवायू जवळजवळ नाहीसा झाल्याने समाजाची कोंडी झाली आहे. हे जाणवते समाजाचे हे घरच कोसळायला आले आहे की काय, असे वाटू लागते. हे सामाजिक प्रदूषण दूर व्हायचे, नवे प्रदूषण टाळायचे तर या नित्य विधायकतेचे महत्त्व आणि मर्म समजून घेतल्याशिवाय तरणोपाय नाही.

खरेच, सामान्य माणसे नित्य विधायकता का जपतात ? जन्माने व नंतर संबंधाने झालेले आप्तमित्र, जात, धर्म, देश, संबंध मानवता यांच्याशी आपला जो संबंध असतो त्या संबंधातून या विधायकतेची प्रेरणा येते का ? मग एकाकी होऊन प्रस्थापिताविरुद्ध लढण्याची विधायकता कोठून येते ?

मोठ्या, असामान्य विधायकतेचा सत्कार होतो, गौरव होतो,पूजा होते.अशा असामान्य व्यक्तींना संतत्व, अवतारत्व, महामानवत्व लाभते. विधायकतेसाठी जे जे सोडलेले असते त्याची परतफेड एका प्रकारे होते; पण छोट्या विधायकता नित्यक्रमाने पार पाडणाऱ्याला हे तेजही मिळत नाही. मनात येते, उद्या पंतप्रधानांनी अटलजींना बोलावले आणि सांगितले, ‘ अटलजी, तुमच्या राष्ट्रनिष्ठेवर आणि केन्द्रीय सत्तेची प्रतिष्ठा जपण्यावर माझा विश्वास आहे.तर तुम्ही आसामी विद्यार्थ्यांना भेटा, चर्चा करा आणि सर्व राष्ट्राच्या हिताचा तोडगा काढा. ’ तर आपण काय म्हणू ? पक्षभेद बाजूला ठेवून व्यापक विधायक भूमिका घेतली म्हणून पंतप्रधानांचे अंतःकरणापासून अभिनंदन करू. अमेरिकन ओलिसांचे राष्ट्राच्या वतीने वीसबाडेन येथे स्वागत करण्यासाठी रेगन यांनी कार्टर यांनाच पाठविले. तसे हे होईल आणि अटलजीही ही जबाबदारी उत्साने स्वीकारतील अशी मला खात्री वाटते.

पण, माझा मुद्दा थोडा वेगळा आहे. पंतप्रधान व अटलजी यांना अशा (स्वप्नसदृश) विधायकतेने जी प्रतिष्ठा मिळेल ती रास्त असेल; पण छोट्या क्षेत्रात, एखाद्या संस्थेत, विधायक वृत्तीने एखाद्याने अशीच उदात्त वृत्ती दाखवली तर त्याला तेवढीच प्रतिष्ठा मिळेलच असे नाही.

आपले सद्‌वर्तन असे अज्ञात, अपेक्षित राहणार अशी जवळजवळ खात्री असतानाही आपण सामान्य माणसे विधायकतेचा नित्यक्रम का चालू ठेवतो ? कष्ट, यातना सोसूनदेखील हा क्रम आपण चालू ठेवतो. छोटे छोटे त्याग बिनतक्रार करतो. न झेपणाऱ्या कठिण जबाबदाऱ्या हौसेने अंगावर घेतो नि निकराने पार पाडतो. का हे आपण करतो ?

हा काही विशिष्ट देशाचा किंवा धर्माचा किंवा वंशाचा खास वेगळेपणा नाही. सर्व देश, सर्व धर्म, सर्व वंश यातील सामान्य माणसे विधायकतेचे व्रत चालवीत असतात. त्यासाठी स्वत.चे क्षेत्र सोडून खास विधायकतेचे म्हणून वेगळे क्षेत्र त्यांना शोधावे लागत नाही. स्वत.च्या जीवनक्षेत्रातच ते वागण्यात विधायकता राखतात. ती त्यांची वृत्तीच असते. '

विधायकता ही एखादी कृती नाही तर ती एक वृत्ती आहे, हे सामान्यांना उमजलेले असते. ते त्यांना कसकसे उमजत जाते या संबंधी पुन्हा केव्हा तरी. □


## ‘ अक्षर दिवाळी ’ – १९८०

**१९८० च्या दिवाळी अंकातील कथा, कादंबरिका, कविता व्यंगचित्रे, ललित व वैचारिक लेख असे निवडक साहित्य**

संपादक मंडळ—य. दि. फडके, स. शि. भावे, आनंद यादव, प्र. ना. परांजपे, दिनकर गांगल

दि. १६–५–८१ रोजी प्रकाशित होणार.

डेमी आकार, सुमारे ४०० पृष्ठे, मूळ किंमत रु. ३२/–

मर्यादित प्रतीसाठी घरपोच सवलतीची किंमत रु. २२/–

११ प्रती मागविणारास नजिकच्या एस्. टी. अगर रेल्वेस्थानकापर्यंतच्या वाहतूक खर्चासह रु. २४२/– ऐवजी रु. २००/– फक्त

ड्राफ्ट अगर मनीऑर्डरने आजच रक्कम धाडा.

**विश्वकर्मा साहित्यालय** | २०३५ सदाशिव, टिळक पथ, पारिजातजवळ, पुणे ४११ ०३०.

अवती–भवती । शरद कृष्णन्

# □ भाई डांगे यांची हकालपट्टी

पंतप्रधान इंदिरा गांधी याच्याबद्दल भाई डांगे याना कितीही आपुलकी असली तरी आता उतार वयात ते काही आक्रमक चाल खेळतील असे उजव्या कम्युनिस्ट पक्षामधील त्यांच्या सहकाऱ्यांना वाटत नव्हते. त्यामुळे भाईंकडून इंदिराजीच्या कारभाराची तारीफ करणारी वक्तव्ये अधूनमधून होत असली तरी पक्षाने त्याकडे दुर्लक्ष केले. तथापी पक्षाविरुद्ध उघडउघड बंडखोरी करून भाईंच्या मुलीने मीरतला मार्चच्या १३ तारखेला जे अधिवेशन बोलावले होते त्या अधिवेशनात भाईंनी इंदिराजीची तारीफ केली. स्वपक्षावर दुगाण्या झाडल्या आणि नवीन दृष्टी असलेला कम्युनिस्ट पक्ष स्थापन करण्याची कशी आवश्यकता आहे याचे आग्रहपूर्वक प्रतिपादन केले. आता इतके झाल्यावर भाईंच्याविरुद्ध काही हालचाल करणे आवश्यक होते. कम्युनिस्ट पक्षाशी असलेले संबंध भाईंनी कमी केले होते तरी पक्षाच्या नॅशनल कौन्सिलचे ते सदस्य होते. खेरीज या देशामध्ये लाल बावटा फडकवणाऱ्या पहिल्या फळीमधील आघाडीचा वीर, अनेक वर्षे पक्षाचे अध्यक्षपद भूषवलेला ज्येष्ठ नेता, रशियामध्ये ज्याच्या शब्दाची आजही कदर केली जाते असा लेनिनपारितोषिक–विजेता धुरंधर राजकारणी, अशा विविध नात्यांनी उजवा कम्युनिस्ट पक्ष म्हणजे भाई डांगे, अशी जी प्रतिमा तयार झाली आहे त्याचे दडपणही पक्षावर होतेच; पण बंडखोरांच्या व्यासपीठावर भाईंनी सक्रिय हजेरी लावल्यावर पक्षाने त्यांना रीतसर नोटीस दिली. भाईंनी कारणे दाखवा नोटिशीची जराही दखल घेतली नाही. कारण रोझा, बाईंच्याबरोबर स्वतंत्र गट उभा करण्याचा निर्णय त्यांनी निश्चितपणे घेतला होता. कारणे दाखवा नोटिशीला दिलेल्या उत्तरात भाई म्हणतात–माझ्याबाबतीत तुम्हाला जे काय करायचे असेल ते तुम्ही खुशाल करू शकता. पक्षाचे सरचिटणीस राजेश्वर राव यानी पक्ष मोडीत काढण्याचे धोरण अवलंबिले आहे, असा आरोप करून भाई म्हणतात–इंदिराजीच्या पुरोगामी धोरणाची जेव्हा मी तारीफ करतो तेव्हा कम्युनिस्ट चळवळीला त्यांचे धोरण पूरक असल्याची माझी खात्री असते. त्यामुळे या संदर्भामधील माझ्या वक्तव्याबाबत क्षमायाचना करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. चरणसिंग यांच्या राजवटीचो आपल्या पक्षाने तारीफ केली होती, त्याकडे लक्ष वेधून भाई म्हणतात, सरळसरळ जमीनदारी धोरणे राबवणाऱ्या त्या शासनाचा पाठपुरावा करणे हे चूकच होते.

कारणे दाखवा नोटिशीला असे आक्रमक उत्तर दिल्यावर श्री. डांगे यांची हकालपट्टी हा एक उपचाराचा भाग होता. तथापी ज्या कारणासाठी भाईंची हकालपट्टी होत आहे त्याचा निचरा होईल असे वाटत नाही. कारण इंदिरा काँग्रेसबरोबर प्राय. सहकार्याचे आणि क्वचित प्रसंगी संघर्षाचे ज धोरण ते सुचवतात त्याला पक्षात मोठा पाठिंबा आहे. डांगे यानी पक्षाध्यक्षपदाचा राजीनामा दिला, त्या वेळी नॅशनल कौन्सिलच्या १८ सदस्यांनी तो स्वीकारू नये असे मत नोंदले होते इंदिराजीबाबतच्या त्यांच्या धोरणाला पक्षात मोठा पाठिंबा आहे. त्याच्या आग्रहाखातर इंदिराजीच्या प्रागतिक धोरणाची पक्षाने तारीफ केली होती. भाईंचे इंदिराजीबाबतचे धोरण मान्य असलेली अनेक मंडळी पक्षात आहेत. डांगे याची हकालपट्टी झाल्यावर ही सर्व मंडळी पक्ष सोडतील अशातला भाग नाही. म्हणजेच ज्या कारणासाठी राजेश्वर राव आणि कंपनी भाईंची हकालपट्टी करत आहेत ती कारणे तापदायक ठरण्याइतकी शिल्लक राहणार आहेतच.

भाईंची हकालपट्टी झाली असली तरी या निर्णयाबाबत रशियाचे धोरण काय राहील याबाबतही पक्षाच्या नेत्यांना चिंता वाटते. पण मॉस्कोचा आपल्यालाच पाठिंबा आहे हे पुरेसे स्पष्ट व्हावे या हेतूनेच मॉस्को येथे झालेल्या २६ व्या आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट काँग्रेसला हजर राहून आल्यानंतर, इंदिरा काँग्रेसवर आणि या पक्षाच्या केंद्रीय शासनावर सडकून टीका केली गेली. रात्री मात्र त्याचबरोबर इंदिराजीबद्दल सहानुभूती असलेल्याचेही समाधान व्हावे अशी पुस्तीही जोडण्यात आली. पक्षाच्या अधिकृत निवेदनात असे स्पष्ट म्हटले आहे की, इंदिरा शासनाला आमचा सर्वस्वी आणि आंधळा विरोध नाही. या शासनाच्या परराष्ट्रीय धोरणास आमचा पाठिंबा आहे. या शासनाबरोबर अनेक प्रश्नांवर आमचे मतभेद असले तरी इंदिरा सरकार हा काही आमचा एक नंबरचा शत्रू नव्हे. म्हणजे एकीकडे भाईंची हकालपट्टीही करायची आणि त्याचबरोबर पक्षामध्ये मोठी फूट पडू नये अशा पद्धतीची गुळमुळीत निवेदनेही प्रसिद्ध करायची, असल्या या धोरणाने या पक्षाचे काय भले होणार आहे ते समजू शकत नाही.

एक तर आधीच या पक्षाची ताकद कमालीची मर्यादित. पक्षामध्ये पहिली फूट पडली तेव्हा भाईंकडे नेतृत्व असल्याने त्याचा पाठपुरावा करणारी मंडळीच पक्षात होती. आता भाई पुन्हा आपल्या लेकीबरोबर बाजूला होऊन ऑल इंडिया कम्युनिस्ट पार्टीचा झेंडा रोवत आहेत. महाराष्ट्र आणि प. बंगालमध्ये या बंडखोरांना बऱ्यापैकी पाठिंबा मिळेल. भाईंच्या चरणी निष्ठा वाहिलेली अनेक मंडळी रोझाबाईंबरोबर काम करू लागतील. प. बंगालमधील दोन्ही कम्युनिस्ट पक्षाची युती ज्याना मान्य नाही अशी मंडळी भाईंच्यामागे येतील.

कम्युनिस्ट पक्षामधील या घडामोडीकडे इंदिरा काँग्रेसचेही लक्ष असल्याने नेमक्या याच वेळी 'फ्रेंडस् ऑफ सोव्हिएट युनियन' नावाचे पिल्लू अलगद सोडून देण्यात आले आहे. कम्युनिस्ट पक्षाच्या पाठपुराव्यावर चालणारी इंडो–सोव्हिएट कल्चरल सोसायटी मॉस्कोशी संपर्क साधून असली तरी सांस्कृतिक पातळीवर मॉस्कोबरोबर थेट संपर्क साधता यावा याच हेतूने इंदिरा काँग्रेसतर्फे इंडो–सोव्हिएट कल्चरल सोसायटीचे काम सुरू करण्यात आले आहे.

कम्युनिस्ट पक्षातून रोझाबाईंच्या नेतृत्वाखाली जो गट फुटून निघाला आहे त्या गटाबाबत मॉस्कोचे धोरण ताठर राहील असे वाटत नाही. अधिकृत पक्षाला पाठिंबा देऊन रोझाबाईंच्या गटाबद्दल नरम धोरण स्वीकारले जाण्याची शक्यता आहे. ब्रेझनेव यानी त्याच्या भारत–भेटीच्या वेळी इंदिराजीच्या विविध धोरणाची तारीफ केली होती. त्यामध्ये केवळ उपचाराचा भाग नव्हता, तर खरोखरच आपुलकी होती. त्यामुळेच प्रामुख्याने इंदिराजीचे समर्थन करण्यावरून पक्षात फूट पडत असताना, रशियन कम्युनिस्ट पक्ष फुटीर गटाच्या बाबतीत मोठे कडक धोरण स्वीकारेल, अशी अपेक्षा

ठेवता येणार नाही. उजव्या कम्युनिस्ट पक्षामधील नवीन फूट कम्युनिस्ट चळवळीला घातक ठरल्याखेरीज राहणार नाही.

अनुयायांची कमतरता असली तरी नवीन नवीन पक्ष काढण्याच्या बाबतीत आपल्या नेत्यांचा कोणी हात धरणार नाही. हेमवतीनंदन बहुगुणा यांनी मुंबईमध्ये अधिवेशन भरवून डेमोक्रॅटिक सोशालिस्ट फ्रंटची स्थापना केली. स्थापना झाली; पण पुढे काय ? आता चंद्रजित यादव लोकदलातून बाहेर पडले. आहेत त्यांनी एप्रिलच्या पहिल्या सप्ताहात जनवादी लोकशाही पक्षाची स्थापना केली आहे. म्हणजे लोकदलाच्या चिंध्या होण्याची प्रक्रिया चालूच आहे. आज इंदिराजी पुन्हा सत्तेचे केंद्रीकरण करू पहात आहेत. माझ्या मर्जीखेरीज विरोधी पक्षांची राज्यामधील सरकारे तासभरही टिकू शकणार नाहीत, अशी भाषा करत आहेत. अशा वेळी विरोधी पक्षात फाटाफूट चालू असावी आणि परिस्थितीचे भान कोणालाच असू नये याचे मात्र आश्चर्य वाटते.

## □ कायदा मंत्रालय विरुद्ध सर्वोच्च न्यायालय

भारत सरकारचे कायदा मंत्रालय व सर्वोच्च न्यायालय यांचे संबंध सध्या जरा ताणलेलेच आहेत. उच्च न्यायालयामधील न्यायमूर्तींच्या बदलीबाबत सर्वोच्च न्यायालय फारसे अनुकूल नाही. यासंबंधात कायदा मंत्रालय मुख्य न्यायमूर्ती श्री. वाय्. व्ही. चंद्रचूड यांच्याशी संपर्क साधून होते. प्रत्येक बदली-प्रकरणाचा स्वतंत्रपणे विचार करून मुख्य न्यायमूर्तींच्या सल्ल्याने प्रकरण निकाली काढावे असे संकेत होते. पाटणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश के. बी. नारायण सिंग व मद्रास उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती एम्. के. मोहंमद इस्माइल यांची बदली-प्रकरणे श्री. चंद्रचूड यांच्या सल्ल्याने हाताळली गेली होती; तरीही उच्च न्यायालयाच्या दोन्ही न्यायमूर्तींनी याबाबत तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. न्यायमूर्ती इस्माइल यांनी तर या प्रकरणी चक्क राजिनामा दिला, तर के. बी. नारायणसिंग यांनी विलक्षण तिखट प्रतिक्रिया व्यक्त केली. उच्च न्यायालयामधील न्यायमूर्तींच्या यापूर्वीही बदल्या झालेल्या असल्या तरी उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींची अशा प्रकारे बदली करण्यात आलेली नव्हती.

न्यायमूर्तींच्या नेमणुका, बढत्या आणि बदल्या हा पूर्णपणे आपल्या अखत्यारीमधील भाग आहे, हे कायदा मंत्रालयाला सिद्ध करायचे आहे. यापूर्वीही गरज असेल तेव्हा कायदा मंत्रालयाने याबाबत आक्रम भूमिका घेतली आहे. इंदिराजीच्या राजवटीत सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती म्हणून ए. एन. रे याची नेमणूक अशाच आक्रमक भूमिकेतून करण्यात आली होती. सर्वसाधारणपणे सेवाज्येष्ठता हे प्रमाण मानून मुख्य न्यायमूर्तींची नेमणूक करायची असा संकेत असला तरी तो चक्क धाब्यावर बसवण्यात आला आणि शासनाला जे सर्वांत ज़ास्त सोयिस्कर वाटले त्या ए. एन. रे यांची मुख्य न्यायमूर्ती म्हणून नेमणूक करण्यात आली. अर्थात ज्याची सेवाज्येष्ठता डावली गेली होती अशा तिन्ही न्यायमूर्तींनी लगोलग राजिनामे दिले. अर्थात त्यामुळे निर्णयात काहीच बदल झाला नाही. पुढे आणीबाणीच्या काळात तर उच्च न्यायालयामधील सोळा न्यायमूर्तींच्या बदल्या करण्यात आल्या. तथापी उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधिशांना कधी हात लावण्यात आला नव्हता. आता याही बाबत आक्रमक पावले टाकून कायदा मंत्रालय आपला निर्विवाद अधिकार प्रस्थापित करू पहात आहे. अर्थात या बदली-प्रकरणी आपण सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींचा सल्ला घेतला होता, असा दावा कायदा मंत्रालयाला करता येईल. बदली-प्रकरणी मुख्य न्यायमूर्ती वाय. व्ही. चंद्रचूड याची भूमिका ताठर असली तरी बदलीच्या प्रत्येक प्रकरणाचा स्वतंत्रपणे विचार करून मुख्य न्यायमूर्तींच्या साहाय्याने निर्णय घ्यावा या गोष्टीला त्यांनी मान्यता दिलेली आहे. वर उल्लेखलेल्या उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांच्या बदली-प्रकरणी मुख्य न्यायमूर्ती चंद्रचूड यांचा सल्ला घेण्यात आला होता. उच्च न्यायालयामधील न्यायधिशाची बदली अपवादात्मक प्रकरणी व्हावी, असा या संदर्भात मुख्य न्यायमूर्ती चंद्रचूड यांचा दृष्टिकोन आहे. याउलट वरिष्ठ सरकारी सेवकाच्या बदल्या जितक्या सहजपणे केल्या जातात तितक्या सहजपणे उच्च न्यायालयामधील न्यायाधिशांच्या बदल्या करता आल्या पाहिजेत, असा शासनाचा याबाबतचा दृष्टिकोन दिसतो. देशात सध्या अठरा उच्च न्यायालये असून त्यात तीनशेऐंशीहून जास्त न्यायाधीश काम करतात. सर्वसाधारण कारणांसाठी जर त्यांना मुंबईहून पाटण्याला अथवा कलकत्त्याहून त्रिवेंद्रमला पाठवण्यात येऊ लागले तर सोइस्कर राजकीय कारणांसाठी बदलीचा हत्याराप्रमाणे उपयोग केला जाईल आणि म्हणूनच अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत बदली करावी असा न्यायमूर्ती चंद्रचूड यांचा या बाबतीत दृष्टिकोन आहे. मात्र शासन या बाबतची आपली आग्रही भूमिका पुढे रेटू पहात आहे.

### कायदामंत्र्यांच्या पत्रावर तिखट प्रतिक्रिया

केंद्रीय कायदामंत्र्यानी अलीकडेच अनेक राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून, उच्च न्यायालयामधील अतिरिक्त न्यायाधिशांकडून ते बदली स्वीकारण्यास तयार असल्याबाबतचे पत्र लिहून घ्यावे, तसेच त्यांना त्यांच्या पसंतीची तीन उच्च न्यायालये सुचवण्याची मुभा द्यावी, याबाबत त्यांनी अग्रक्रमही द्यावा; परंतु तो मानला जाईलच असे नाही, असे कळविले होते. नकार देणाऱ्या न्यायाधिशांबाबत काय करणार याचा काहीही खुलासा या पत्रात नव्हता. काही उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींनी आपण अशा प्रकारे बदल्या स्वीकारण्यास तयार असल्याचे लिहूनही दिले होते. तथापी कायदा-मंत्रालयाच्या या पत्रावर वकीलमंडळीच्या अनेक संघटनांनी तीव्र स्वरूपाची नाराजी व्यक्त केली. सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती श्री. वाय. व्ही. चंद्रचूड हे या पत्र-प्रकरणी विलक्षण संतापले असून आपली भूमिका स्पष्ट करणारे पत्र त्यांनी कायदामंत्री शिवशंकर याना लिहिले आहे. मुख्य न्यायमूर्तींच्या या भूमिकेमुळे बदली-प्रकरणाची गुतागुत वाढली आहे. इतकेच नव्हे तर ज्यांनी बदली स्वीकारण्याची तयारी दर्शवली होती अशा अनेक न्यायाधिशांनी आपण बदली स्वीकारण्यास तयार नसल्याचे कळवले आहे.

कायदामंत्र्यांना लिहिलेल्या पत्रामध्ये श्री. चंद्रचूड यानी ज्या पद्धतीने हे बदली-प्रकरण हाताळले जात आहे त्याबाबत निषेध नोंदवला आहे. या पत्राचा एकूण सूर अतिशय कडक आहे. उच्च न्यायालयामधील न्यायमूर्तींची बदली करताना सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींचा सल्ला घेतला जावा, अशी जी घटनात्मक तरतूद आहे, त्याकडे श्री. चंद्रचूड यांनी कायदामंत्र्याचे लक्ष

वेधले आहे. न्यायदानाचा नि.पक्षपातीपणा सांभाळला जाण्याच्या दृष्टीने बदली ही अपवादात्मकच असली पाहिजे, बदली हा शिक्षेचा, सूडाचा अथवा राजकीय सोयी-गैरसोईंचा भाग नसला पाहिजे, हे मुख्य न्यायमूर्तींनी आपल्या पत्रात स्पष्ट केले असून, न्यायमूर्तीं-कडून बदली स्वीकारण्यास तयार असल्याबाबत लेखी पत्र घेणे हे न्यायपद्धतीच्या पूर्व संकेतास धरून होणार नाही, असे मत नोंदवले आहे.

कायदामंत्री शिवशंकर यांनी बरोबर याउलट भूमिका घेतली आहे. उच्च न्यायालयामधील न्यायमूर्तींच्या बदल्या करण्यातच राष्ट्रीय हित सांभाळले जाईल असे त्यांना वाटते. त्यामुळेच श्री. चंद्रचूड यांचा सरसकट बदल्या न करण्याचा सल्ला त्यांना मानवत नाही. तथापी मुख्य न्यायमूर्तींना एकदम डावलणे अवघड असल्याची शासनाला जाणीव आहे. उच्च न्यायालयाची या पत्राबाबत अशी समजूत आहे की, बदलीबाबत आपला निर्विवाद अधिकार प्रस्थापित करणे आणि उच्च न्यायालयामधील न्यायाधिशांची प्रतिक्रिया अजमावून पहाणे एवढ्याच मर्यादित उद्देशाने कायदा मंत्रालयाने या पत्राचा घोळ घातला आहे. याउलट कायदा मंत्रालयामधील माहित-गार असे सांगतात की, बदली करण्याचा आपला अधिकार निर्विवाद-पणे सिद्ध करण्यास शासन अतिशय उत्सुक आहे; केवळ अधिकार प्रस्थापित करून शासन याबाबत थांबेल असे नाही, तर उच्च न्यायालयामधील अनेक अतिरिक्त न्यायमूर्तींच्या लगोलग बदल्या करून न्यायाधीशाच्या बदल्या हा शासकीय कार्यपद्धतीचा एक नियमित भाग असल्याचे सिद्ध केले. जाईल. या प्रकरणी सर्वोच्च न्याया-लयाच्या मुख्य न्यायमूर्तींचा सल्ला मानला जातो असा आजवरचा संकेत असल्याने हा सल्ला डावलणे सोपे नाही.

मुख्य न्यायमूर्ती आणि शासन यांचे संबंध मोठे सुरळीत आहेत असे नव्हे. जनता राजवटीच्या काळात श्री. चंद्रचूड यांची सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती म्हणून नियुक्ती झाली आहे. त्या वेळी श्री. चंद्रचूड यानी पूर्वी दिलेल्या काही निकालांचा आधार घेऊन त्यांच्या नेमणुकीस विरोध करण्यात आला होता. तथापी जनता सरकारने सेवाज्येष्ठताक्रम ही कसोटी मानण्याचा जुना संकेत प्रमाण-भूत मानून श्री. चंद्रचूड यांची मुख्य न्यायमूर्ती म्हणून नेमणूक केली. मुख्य न्यायमूर्ती सर्वसाधारणपणे हे पद ग्रहण केल्यापासून दोन वर्षांत निवृत्त होतो. तथापी श्री. ए. एन. रे प्रकरणी सर्वोच्च न्यायालया-मधील तीन न्यायमूर्तींनी राजिनामे दिल्याने श्री. चंद्रचूड यांना लवकर संधी मिळाली. त्यामुळे कोणाही मुख्य न्यायमूर्तींना मिळाली नाही इतकी प्रदीर्घ कारकीर्द श्री. चंद्रचूड यांच्या वाट्याला आली. ते जुलै १९८५ पर्यंत आपल्या अधिकारपदी राहतील. स्वाभाविकपणे अनेक वादग्रस्त प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाची भूमिका घडवण्या-बाबत त्यांना महत्त्वपूर्ण वाटा उचलावा लागत आहे. बदली-प्रकरणी त्यांची भूमिका वकील संघटनाकडूनही प्रशंसली गेली आहे. □

## काही वृत्तविशेष

□ केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये मोठे फेरबदल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. व्ही. सी. शुक्ला यांच्या हकालपट्टीची जी कारणे देण्यात आली आहेत त्यावरून योग्य तो बोध अनेक मंत्र्यांनी घेतला असून आपल्या मंत्रालयाच्या कामात विशेष लक्ष घालण्यास प्रारंभ केला आहे. तरीही होऊ घातलेल्या फेरबदलाचे वेळी ग्यानी झैल-सिंग यांचे गृहखाते काढून घेतले जाण्याची शक्यता आहे. पण गृहखाते कोणाकडे सोपवावे याबाबत पंतप्रधान अद्यापि निर्णय करू शकलेल्या नाहीत; या संदर्भात इंदिरा कॉंग्रेसमध्ये येऊ घातलेले श्री. सिद्धार्थ शंकर रे यांचे नाव घेतले जाते. तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री-पद सांभाळण्यास योग्य पर्याय मिळाला तर विद्यमान मुख्यमंत्री ए. आर. अंतुले याना केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये महत्त्वपूर्ण खाते दिले जाण्याची शक्यता आहे.

विद्याचरण शुक्ला मंत्री असताना दिल्लीमध्ये होणाऱ्या आशीयाई क्रीडास्पर्धेच्या समितीचे अध्यक्ष होते. आता त्यांचे मंत्रिपद गेल्याने त्यांना या समितीचे अध्यक्ष म्हणून काम पहाणे शक्य होणार नाही. ज्या वेगाने काम हालणे जरूर आहे त्या वेगाने काम करवून घेऊ शकणारा सूत्रधार असणे अत्यंत आवश्यक आहे अर्थात केंद्र सरकारजवळ ज्याचे वजन आहे अशीच व्यक्ती समितीच्या अध्यक्षपदी असणे जरूर आहे. या स्पर्धा कितपत यशस्वी होतील अशी शंका असल्याने राजकीय महत्त्वाकांक्षा असलेली कोणीही व्यक्ती पुढे येण्यास तयार नाही. या संदर्भात बुटासिंग व माजी केंद्रीय उपगृहमंत्री श्री. रामनिवास मिर्धा याचे नाव घेतले जात आहे. अर्थात हे दोघेही मोठे उत्सुक आहेत अशातला भाग नव्हे, पण या दोघापैकीच, बहुधा बुटासिंग यांना आशियाई क्रीडास्पर्धा यशस्वी करून दाखवण्याची अवघड किमया करून दाखवावी लागेल.

□ संजयच्या निधनानंतर अगदी चिडीचीप असलेल्या मनेका गांधी यानी थोडी-फार हालचाल करण्यास प्रारंभ केला आहे. आपले दीर राजीव गांधी यांच्याशी त्या संपर्क ठेवून असून आपण क्रियाशील राजकारणामध्ये सहभागी होणे कसे आवश्यक आहे हे श्री. राजीव गांधीना पटवून देण्याच्या त्या प्रयत्नात आहेत. मनेका गांधी यांनी राजकारणात यावे अशी इंदिराजींची इच्छा नसली तरी राजीव मार्फत पुरस्कार झाला तर मनेकाबाईंना राज्यसभेची खासदारकी बहाल केली जाईल. अर्थात इंदिराजींची त्यांच्याबाबतची भूमिका अजून तरी ताठर आहे. मनेका गांधी व त्यांच्या मातोश्रीना श्रीलंकाभेटीचे श्रीमती भंडारनायके याच्याकडून आमंत्रण होते. सर्व तयारीही झाली होती. तथापी या भेटीचे काही प्रयोजन नाही, असे केंद्र-सरकारकडून सुचवण्यात आल्यावर मनेकाताईंनी आपला दौरा तत्परतेने रद्द करून टाकला.

□ हरियाना आणि हिमाचलप्रदेश या दोन्ही राज्यांच्या विधान-सभाच्या निवडणुका केवळ वर्षाभरावर येऊन ठेपल्या आहेत; हिमाचल-प्रदेशचे मुख्यमंत्री रामलाल आणि हरियानाचे मुख्यमंत्री भजनलाल यांच्या जनमानसामधील प्रतिमा स्वच्छ नाहीत. खेरीज दोघांच्या कारभाराबाबतही पंतप्रधान फारशा समाधानी नाहीत. या राज्यां-मध्ये निवडणुका जिंकून घेण्यास ज्याची मदत होऊ शकेल अशा नेत्याच्या शोधात इंदिराजी असून निवडणुका जिंकता येतील अशी खात्री वाटली तर कदाचित मुदत सपण्यापूर्वीही या निवडणुका घेतल्या जातील.

□

बॅ. ए. आर. अंतुले मुख्यमंत्री झाल्यापासून रायगड जिल्ह्याच्या विकासाला मोठीच गती आली आहे; पण या प्रवाहाचे पाणी जिल्ह्याच्या सर्वच भागांमध्ये आज सारख्या प्रमाणात खेळताना दिसत नाही. रायगड जिल्ह्याच्या अशाच एका उपेक्षित कोपऱ्याचे हे दर्शन.

# एका डोंगरपट्टीत अडकलेले कोकणवासी

प्रा. अरविंद कुलकर्णी, अलिबाग

पूर्वीचा कुलाबा आणि आताचा रायगड जिल्हा हा बॅ. अंतुले यांचा जिल्हा. ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यापासून जिल्हावासियांनीही अचंबित व्हावे अशा तऱ्हेने शासन या जिल्ह्याच्या विकासाकडे लक्ष देत आहे. जवळजवळ हजार कोटी रुपयाचा प्रचंड खत-प्रकल्प अलिबाग-रेवत मार्गावरील थळ-वायशेत येथे झपाट्याने आकारास येतो आहे. त्या निमित्ताने रस्त्याचे रुंदीकरण व नूतनीकरण जोराने चालू झालेले आहे. कर्मचाऱ्यासाठी वेगवेगळ्या टाइपची घरे आकाराला येत आहेत. चोंढीहून किहीमला जाणाऱ्या रस्त्यावर वडके विद्यालयासमोर मागे रिकामी सरकारी जमीन होती. आज तिथे आधुनिक, आकर्षक अशा बंगल्यांचे नि ब्लॉक्सचे जणू काही छोटेखानी गावच उभे राहिलेले आहे. धरमतर खाडीवरील मोटारीसाठी बांधलेल्या जुन्या पुलाशी समांतर असा एक रेल्वे-पूल जवळजवळ पूर्ण झालेला आहे. या साऱ्यावर अक्षरशः कोटींनी रक्कम खर्ची पडलेला आहे. मुंबईकरांचेच नव्हे, तर शहरांतील व्यापारी मंडळीच लक्ष या भागाकडे वळल्यामुळे वरकस, भात-शेती व बागायती याना प्रकल्पासाठी अनुक्रमे दर एकरी बारा, पंधरा व वीस हजार रुपये असा त्या वेळी मोठा वाटलेला दर आज चाळीस हजारावर गेलेला आहे !

याबरोबरच जिल्ह्यात नानाविध नवीन उपक्रम जाहीर झालेले आहेत. अलिबाग-रोहा रस्त्यावर खानाव-उसर येथे सुमारे पाच-सहाशे कोटींचा पेट्रोकेमिकल प्रकल्प उभा रहाणार आहे. कारण या जिल्ह्याच्या किनारपट्टीवर एका मैलाच्या अंतरावर पेट्रोलच्या विहिरींची रांग आढळलेली आहे. त्याचप्रमाणे माणगाव तालुक्यातील वणंरे येथे कोकण विद्यापीठ उभे रहाते आहे. याशिवाय इतर तंत्र-शिक्षण देणारी विद्यालये, इस्पितळे, विमानासाठी धावपट्टी अशा गोष्टी व्हायच्या आहेत. या गोष्टी केवळ आश्वासनाच्या रूपात नसून प्रत्यक्षात उतरू लागल्या आहेत.

तसेच रेवस-करंजा असा खाडीवर पूल व्हायचा आहे. मोरा-मुंबई असाही पूल व्हायचा असून यापुढे मुंबई-अलिबाग हे अंतर दोडेक तासाचे होईल. यावरून हे सहज लक्षात येऊ शकेल की, येत्या काही वर्षात या जिल्ह्यावर शेकडो-हजारो कोटींनी रक्कम खर्ची पडणार आहे शासन सुरू करीत असलेल्या प्रचंडकाय प्रकल्पाच्या अनुरोधाने सुरू होणारे जोडउद्योग ध्यानी घेतले तर काल-परवापर्यंत पूर्णपणे दुर्लक्षित असलेला हा भूभाग कसा गाजता-नादता होणार आहे याची कल्पना येऊ शकेल. कृषिसंस्कृतीच्या अगदी मागास स्थितीत असलेल्या या भागाला नवे औद्योगिक वसाहतीचे रूप देऊन गतिमान बनविण्याचा कृतिशील प्रयत्न करणाऱ्या बॅ. अंतुले यांचा या भागातील नागरिक नक्कीच ऋणी राहील; पण एका बाजूने प्रकाशमान होत चाललेल्या या जिल्ह्यात सर्वांनाच या प्रकाशाचा लाभ घेण्याची संधी मिळत नाही, याचा खेद वाटतो. कुठल्याही प्रदेशात होणारी वाढ समान स्वरूपात झाली तर त्या वाढीला काही तरी अर्थ असतो. या जिल्ह्यावर होऊ घातलेले आर्थिक प्रगतीचे संस्करण जर असमान झाले, त्यातून संभवणाऱ्या सुविधा-पासून जिल्ह्यातील काही भाग वंचित रहाणार असला तर त्या आर्थिक प्रगतीला कितीशी किंमत देता येईल ?

वाचकाना कदाचित् धक्का देईल अशा या जिल्ह्यातील एका भूभागाचे वास्तव-दर्शन घडविण्याचा यासाठीच इथे प्रयत्न करतो आहे. या जिल्ह्याच्या दक्षिणेस मुरुड, रोहा आणि (खाडीपली-कडील) माणगाव या तालुक्याच्या मध्यभागी डोंगरपट्टी आहे. त्या पट्टीत गोपाळवट, बोडण, केळघर, महालोर, वादरखुड, मुचणे, साटल्याची वाडी, उचेल, आराळी, नागशेत, वाघीरपट्टी, फणसवाडी, वावडुग, वेळासते, फोफळी, म्हसाडी अशी छोटी छोटी सोळा खेडी वसलेली आहेत. त्यांची एकूण लोकसंख्या तीन हजारापर्यंत होईल. या खेड्यांची स्थिती सध्या अत्यंत दयनीय आहे.

या भागात भातशेती अत्यल्प आहे. जी काही शेती आहे ती डोंगर फोडून बनविलेली वरकस शेती आहे. त्यात नाचणी, वरी, तीळ, हरीक अशी किरकोळ पिके ढोरमेहनतीने काढली जातात. इथला शेतकरी जे श्रम करतो ते पाहिले तर त्याला मिळणारा मोबदला कीव वाटावी इतका अल्प आहे. मग त्याला मोलमजुरी करून आणि जंगलफाटा जमा करून त्याच्या विक्रीवर उदरनिर्वाह करावा लागतो. त्यासाठीही त्याला मुरुड किंवा राजापुरीसारख्या ठिकाणी म्हणजे आठ-नऊ मैलाची पहाडी चाल करावी लागते म्हणजे जाता-येता त्याला जवळजवळ वीस मैलाची, तीही पहाडी पायपीट करावी लागते !

## योजना आखली, थंडही झाली !

त्यातच हा सर्व प्रदेश जगलमय आहे, पायवाटेशिवाय कुठेही रस्ते नाहीत. पावसाळ्यात या भागात जळवांचा अतिशय त्रास होतो. १९७१-७२ साली बॅ. अंतुले महाराष्ट्राच्या मन्त्रिमंडळात होते तेव्हा त्यानी या भागात रस्ता करण्याची एक योजना आखली होती. मुरुड-गारंबी-गोपाळवट-बोडण- केळघर- वादरखुड- नागशेत- ताबडी-रोहा असा मार्ग तेव्हा आखला गेला होता. त्याची पहिल्या हप्त्यातील लेव्हलिंग वगैरेची कामे काही ठिकाणी पुरीही झाली; पण नंतर मात्र काम अडले. आजही गारंबीपर्यंत किरकोळ कच्चा रस्ता झाला आहे तेवढाच. रोजगार हमी योजनेखालीही ते काम होऊ शकले असते; पण आजच्या या महागाईच्या काळात दोन-अडीच रुपयांच्या मजुरी-वर लोकानी कसे रावायचे ? योग्य मजुरी नाही म्हणूनही हे काम थांबले, असे एक कारण देता येईल; पण शासनाचे दुर्लक्ष हेच त्या-मागचे खरे कारण आहे. त्यात इतर लोकाचेही भारी नुकसान होत आहे. सध्या मुरुड-रोहा हे अंतर साळावमार्गे ६५ कि. मी. आहे, तर ते भालगावमार्गे ४५ कि. मी. आहे. गोपाळवटमार्ग तयार झाला तर हेच अंतर फक्त २५ कि. मी. होणार असून वेळही जवळ-जवळ निम्मा लागणार आहे; पण लक्षात कोण घेतो अशी सध्या परिस्थिती आहे !

मुरुड तालुक्यातील महालोर आणि रोहा तालुक्यातील गोपाळवट, बोडण, उचेल, साटल्याची वाडी, मुचणे यासारख्या ठिकाणी पहिली ते चौथीपर्यंत शिक्षण देणाऱ्या एकशिक्षकी (आणि एकच खोली असलेल्या) प्राथमिक शाळा आहेत. (प्राथमिक शिक्षक हाच या भागातील मोठा 'पगारदार आदमी !') मराठी सातवीपर्यंतच्या शिक्षणासाठी घोसाळे (रोहा) किंवा भालगाव (मुरुड) येथे जावे लागते, तर हायस्कूलच्या शिक्षणासाठी भालगाव किंवा मुरुड येथे म्हणजे पुन्हा सात-आठ मैलांची पहाडी चाल. सोबतीला टोकाची आर्थिक दुरवस्था आहेच. त्यामुळे शिकायची इच्छा असलेला इथला विद्यार्थी जेमतेम चौथीपर्यंत शिकतो आणि नंतर ढोरे राखण्याच्या उद्योगाला लागतो. कुणी या जंजाळातून सुटू शकलाच तर तो मुंबईसारख्या ठिकाणी जाऊन भांडी घासण्यात ('पितळ पॉलिश' हा इथला शब्दप्रयोग) उरलेला जन्म खर्ची घालतो. इथून बाहेर पडलेला कुणीही मुंबईत वा इतरत्र सुस्थितीत असलेला दिसत नाही. कारण घरची दुबळी आर्थिक स्थिती आणि अपुरे शिक्षण ! सध्या साटल्याची वाडी येथे बिरजोलीचे घरटकरगुरुजी साक्षरता-प्रसाराचे स्तुत्य काम करीत आहेत; पण आहे या स्थितीत तेही साशंकच आहेत.

या शंभर-दीडशे चौरस मैलांच्या परिसरात कसलीही वैद्यकीय सेवा उपलब्ध नाही. सरकारी दवाखाना नाही की कुणी खाजगी डॉक्टर वा वैद्य नाही. झाडपाल्याची किरकोळ औषधे आणि भगताची देवदेवस्की याच्याकडेच या भागातील रोगनिवारणाचे कार्य सोपविलेले दिसते. त्यांचे उपचार उपयुक्त ठरत नाहीत असे दिसले का रोग्याला झोळीत घालून डोंगरवाटेने मुरुडला आणावे लागते. शिक्षण नाही, पैसा नाही, रस्ते नाहीत, बाह्य जगाशी निकटचा सहज संबंध नाही (फक्त कर जमा करायला तेवढे शासन आहे) अशा अवस्थेत इथली माणसे केवळ ईश्वराच्या एकतंत्री कारभारावर विसंबून कसले जिणे जगत असतील याची कुणीही कल्पना करू शकेल. वानगीदाखल एक उदाहरण सांगता येईल. महालोर या खेड्यातील सौ. लक्ष्मी सखाराम अदावडे ही एक तिशीतील गर्भवती आसन्नप्रसूता स्त्री शनिवार दि. ४ ऑगस्ट १९७९ च्या संध्याकाळपर्यंत तिच्या शेतीच्या तुकड्यात राबत होती. रविवारी पहाटे तिला वेदना सुरू झाल्या. कळांच्या तीव्रतेमुळे ती पहाटे चारच्या सुमारास बेशुद्ध झाली. त्याबरोबर सर्वांचा समज असा झाला की तिला झपाटले आहे. मग भगताकरवी मंत्र-तंत्र चालू झाले. दुपारी तीनेक वाजेपर्यंत तिची स्थिती अधिकाधिक बिघडत गेली. मुसळधार पाऊस चालूच होता. मग नवऱ्याने आणि भावाने तिला मुरूडला न्यायचा निर्णय घेतला. दिवस पावसाळ्याचे, रस्ता जंगलातला आणि मुलूख कोकणचा ! झोळण्यात घालून तिला जेमतेम तीन-चार मैल आणले असेल-नसेल, तिने बेशुद्धावस्थेतच एक किंकाळी मारली आणि आपल्या तीन वर्षांच्या थोरल्या लेकाला पोरके करून ती देवाघरी निघून गेली ! गेल्या नोव्हेंबरमध्ये गोपाळवट येथील तीस-पस्तीस वर्षांचा नागू भिवा भुवड हा तरुण रात्री पिकाच्या राखणीसाठी गेला असता त्याला साप चावला. अशा वेळी त्याला मुरूडला नेणेही अशक्य होते. शेवटी औषधोपचारा-शिवाय तो मरण पावला. या अशा प्रातिनिधिक घटनांवर अधिक भाष्य करण्याची जरुरी नाही.

## सारे फक्त 'तत्त्वतः मान्य' !

या भागात प्रामुख्याने तिलोरी कुणबी समाजाची वस्ती आहे. याशिवाय रावमराठे व धनगर आहेत. माणसे सौम्य व शांत प्रवृत्तीची आहेत. देव व दैवशरण आहेत. चोऱ्या नाहीत, गुंडगिरीही नाही. चागल्या बरकतीची खात्री असूनही या भागात दारूभट्ट्यांचा 'गृह-उद्योग' दिसत नाही. गोपाळवटची काही मंडळी पिण्याचे प्रेम बाळगून होती; पण तिथे मागे कसलीशी साथ आली आणि कुण्या गुरूने सांगितले की, दारूमुळे गावावर झालेला हा प्रकोप आहे. त्यामुळे गेली दोन-चार वर्षे तिथल्या शौकिनानीही पिण्याचा त्याग केलेला आहे. माणसे अशी पापभीरु आहेत. कोर्ट-कचेऱ्या नाहीत. प्रसंगोपात निर्माण होणारी भांडणे समाजाच्या पंचायती-कडून सोडविली जातात. पंचाचे म्हणणे मानले जाते, पाळलेही जाते. कसलेही राजकीय ताणतणावही इथे नाहीत. एक तऱ्हेचे थंड, अलिप्त व थिजलेले जिणे या भूभागाच्या वाट्याला आलेले आहे. मुरुड-रोहा टेलिफोनलाइनचा वायरमन, प्रसंगपरत्वे येणारा तलाठी, फॉरेस्टगार्ड किंवा देवी-मलेरियाचा कनिष्ठ कर्मचारी असे काही बाह्य जगाशी संबंध जोडणारे मोजके दुवे त्यांच्याबाबतीत दिसतात. याशिवाय मुरुडसारख्या कामाच्या निमित्ताने ज्यांचा जो काही संबंध येईल तेवढाच ! रोहा व मुरुड तालुकापंचायतीत यातील खेडी विभागली आहेत; पण त्या पंचायतीनाही हा भाग फार दूरचा वाटत असावा असे दिसते. कारण पचायतराज्याचा कसलाच लाभ या भागाला झालेला नाही. बॅ. अंतुले यांच्या मुरुड मतदारसंघात यातील महालोर, नागशेत आदी आठ-नऊ खेडी येतात. महालोरला मतदानकेंद्रही होते. या निमित्ताने काही 'पुढाऱ्या'नी तिथे एखादी फेरी टाकली असेल. एरव्ही इतकी ऊरफोडी चाल पत्करून या भागात कोण, कशाला जातो ?

या भागाकडे सर्वांचे लक्ष वेधावे म्हणून १९८० साली आठ मार्चला गोपाळवट येथे सर्वांचा एक मोठा मेळावा घेण्यात आला. त्याला जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष श्री. फिलसे आणि कृषीवगैरेचे सभापती श्री. कातकर हे हजर होते. या भागात रस्ते झाल्याशिवाय हा भाग पुढे येऊ शकणार नाही. दुग्धव्यवसाय वा कुक्कुटपालन यासारखे जोडधंदेही त्याशिवाय जीव धरू शकणार नाहीत. कारण मुरुड वा रोहा यासारख्या मुख्य ठिकाणाशी जोडल्याशिवाय शिक्षण, आरोग्य, व्यापार वगैरे कसलीच प्रगती या भागात होणार नाही, हे प्रस्तुत लेखकाने मांडलेले विचार त्या वेळी सर्वांनीच मान्य केले. फिलसे – कातकर या दोघांनीही जिल्हा परिषदेच्या वतीने सडकेच्या कामाला अग्रहक्क देण्याचे मान्यही केले; पण त्यानंतर काहीही झालेले नाही. रस्ता, शाळा, साकू, आरोग्यसेवा यासाठी पुन्हा पुन्हा अर्ज करण्यात आले; पण परिणाम काहीही झालेला दिसत नाही. वास्तविक रायगड जिल्हा जनता पक्षाचे अध्यक्ष असलेले श्री. फिलसे किंवा जनता पक्षाचेच श्री. कातकर हे लोकाभिमुख नेते आहेत. कदाचित जि. प. मधील राजकारणाने त्यांना पार गुंतवून ठेवलेले असावे.

भारताला स्वातंत्र्य मिळून आता चौतीस वर्षे झाली. विसाव्या शतकानेही आता शेवटच्या अवस्थेत प्रवेश केला आहे. महाराष्ट्र हे भारतातील नेहमीच पुरोगामी व प्रगत म्हटले जाणारे राज्य होय त्यातच गेल्या वर्षापासून या भागातीलच बॅ. अंतुले हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झालेले आहेत. या जिल्ह्याचा कायापालट करण्यासाठी त्यांनी कंबरही बांधलेली आहे. त्यांचे लक्ष आपल्या दु:स्थितीकडे वेधण्यासाठी गोपाळवटच्या परिसरातील या हजारो अभाग्यांनी आता करावे तरी काय? आजच्या काळात जिवंतपणीच त्यांना मध्ययुगीन स्वरूपाचे जिणे जगावे लागत आहे, हे शासनाच्या दृष्टीनेच शोभादायक नाही असे म्हणायला हवे.

असे म्हटले जाते की, सध्या रायगड जिल्ह्याला लाभलेले कलेक्टर श्री. भास्करराव पाटील हे एक लोकहितवादी अधिकारी आहेत. दीन–दुबळ्यांबद्दलची मोठी कणव त्यांच्याजवळ आहे. तसेच जि. प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अंभईकर हेही एक ज्ञानपिपासू सभ्य गृहस्थ आहेत. या दोघा अधिकाऱ्यांनीच आता पुढे सरसावायला हवे. जिल्हा परिषद याबाबत काही करील असे दिसत नाही. तेव्हा यांनीच गोपाळवट परिसरातील बुडत्यांना हात द्यावा आणि त्यांच्या कारकीर्दीत होऊ घातलेल्या जिल्ह्याच्या आर्थिक अभ्युदयाच्या संस्करणात या उपेक्षितांनाही थोडी जागा द्यावी.

□

---

श्यामचा संसार (कथा नववी)

फिरोझ रानडे

# आता मराठी नेत्यावर चित्रपट

'अय्या, अहो हे पाहिलंत का?' राधाने आनंदाने जवळजवळ अगदी ओरडतच विचारले.

रविवारचा दिवस होता. दुपारी उशीरा मस्त जेवणे झाली होती. मुले कोणी बाहेर गेली होती, कोणी घरात झोपली होती. राधा व श्याम आपली दुपारची झोप आटोपून चहा घेत घेत रविवारची वर्तमानपत्रे वाचत पडली होती. त्यातलेच काही वाचता वाचता राधा मघाचाच आनंदमिश्रित प्रश्न विचारती झाली.

ह्या 'अय्या'मुळं स्त्रियांची किती तरी सोय झाली आहे नाही? श्यामच्या मनात विचार आला. प्रत्येक 'अय्या' हा आपआपल्या परीने वेगळा असतो. जसे एलोरच्या मंदिरातले हत्ती! तिथे एकशेआठ हत्ती आहेत म्हणे. सगळ्यांना एक सोंड, चार पाय, एक शेपूट, दोन कान व भले मोठे पोट आहे; पण प्रत्येक हत्ती आपला वेगळा! एकासारखा दुसरा नाही. जो कोणी एकासारखा दुसरा दाखवून देईल त्याला सरकारने एक हजार रुपयाचे बक्षीस ठेवले आहे, असे तेथला गाईड मजेने सांगत असतो.

त्याचप्रमाणे बायकांचा प्रत्येक 'अय्या' हा अडीच अक्षरांचा व भाववाचक नाम का काय जे जसेल ते असतो व असे 'अय्या' एकशेआठ वेळाच नव्हे तर शेकडो एकशेआठ वेळा बायका उद्गारतात; पण एकासारखा दुसरा नसतो. आणखी वर ह्या एकाच 'अय्या'तून त्या राग, लोभ, काम, मत्सर वगैरे नाना रस निर्माण करू शकतात.

हे सर्व विचार श्यामच्या मनात येत होते; त्यामुळे राधाच्या 'अय्या' प्रश्नाला त्याची काहीच प्रतिक्रिया मिळाली नाही. त्यामुळे राधा चिडली व म्हणाली, 'अहो, मी तुम्हाला एवढे महत्त्वाचे सांगते आहे आणि तुमचे आपले लक्ष दुसरीकडेच!'

''दुसरी'कडे कस असेल? माझी एकुलती एक बायको आहेस तू. 'दुसरी'कडे लक्ष द्यायला दुसरी आहे कुठे? ह्या हिंदू कोडाने...' श्याम.

'बरं, बरं, फालतू विनोद राहू देत. मी तुम्हाला ही बातमी व त्यावर दिलेली माहिती वाचून दाखवत होते.'

खरं म्हणजे त्या वेळी श्यामला फालतूच काय पण उच्च प्रतीचा पण विनोद करावयाचा नव्हता.

*'अय्या, हे पाहिलंत का?'* ह्या राधाच्या प्रश्नाने श्यामची जी विचार-मालिका सुरू झाली होती त्यापुढे तो चुप राहिला होता. त्या चुप राहण्याने राधा चिडून जाऊन चागला मजेत चाललेला रविवार बिघडून गेला असता. रविवारी बायकोचा मूड चागला राहणे हे पुष्कळ दृष्टीने नफ्याचे असते, हे श्याम अनुभवाने शिकला होता व तो 'मूड' राहावा म्हणून 'दुसरी'चा फालतू जोक!

राधा वाचून दाखवू लागली–'अॅटनबरोने 'गांधी' सिनेमा काढल्यावर व रशियाने पंडित नेहरूंवर सिनेमा काढावयाचा हे

जाहीर केल्यापासून जगातल्या सर्व राष्ट्रात हिंदुस्थानच्या एकेका पुढाऱ्यावर सिनेमा काढण्याबाबत अगदी अहमहमिका लागली आहे. फ्रान्स सरोजिनी नायडूवर, जर्मनी सुभाषचंद्र बोसावर, तर आणखी कोणते देश आणखी कोणा पुढाऱ्यांवर सिनेमा काढण्याकरता भारत सरकारपुढे आपल्या योजना मांडून आपल्याला भारत सरकार किती 'कोटी' देणार ह्याची विचारणा करत आहेत.

'ह्या अनेक देशांप्रमाणे भारताचे जे सगळ्यात खरे मित्रराष्ट्र—म्हणजे आपले भूतान—त्या भुताच्या राजाने पण भारत सरकारकडे आपल्यालाही एका भारतीय नेत्यावर सिनेमा काढावयाचा आहे असे कळवले आहे.'

'तू भूतानच्या राजाचा 'भुतां'चा राजा असा उच्चार करू नकोस बरे!'

'परत फालतू विनोद? अहो, खरी मजा तर पुढेच आहे.' एवढे म्हणून राधा 'खरी मजा' पुढे वाचून दाखवू लागली.

"भुताच्या राजाला नुसताच भारतीय पुढाऱ्यावर सिनेमा काढायचा नाही आहे. तर त्याला मराठी पुढाऱ्यावरच सिनेमा काढावयाचा आहे व त्याचे डायरेक्टर भुताचे सुप्रसिद्ध.....काय तरी बाई घाणेरडे नाव." राधाने आपले अपरे नाक वाकडे केले.

श्यामला राधाचे नाक वाकडे करणे पटले. कारण मागेसुद्धा भूतानच्या कोणा पंतप्रधानाचे नाव असच नाक वाकडे करण्यासारखे होते, हे त्याला आठवले; पण आता भूतानचा राजा मराठी नेत्यावर सिनेमा काढतो आहे म्हटल्यावर अशा जुजबी गोष्टीकडे दुर्लक्ष करणे महाराष्ट्रीय कर्तव्यच ठरणार होते.

'भुताच्या डायरेक्टरची एक अशी अट आहे का, तो ॲटनबरोसारखे पुढाऱ्याचे नाव, गाव, काम करणारी मंडळी जाहीर करणार नाही. कारण तसे केल्याने वर्तमानपत्रात त्याचा फार चर्चा होते, टीका होते व काम करणारे नट व नट्या glamovise होतात म्हणे! हे सर्व वाचून झाल्यावर राधा थोडी थांबली व विचार करू लागली "कोण असेल बुवा हा मराठी पुढारी?"

श्यामने विचारले.

'शिवाजी!' राधा कोणताही मराठी माणूस उत्तर देईल तसे देत म्हणाली.

'शिवाजी?' श्याम राधाला वेडावत म्हणाला, "अगं, शिवाजी काही पुढारी नव्हता. तो राजा होता. त्याने हिंदूचे राज्य स्थापन केले. ब्रिटिश हिंदुस्थानात येण्या—आधी येथे पुढारी थोडेच होते? आणि त्यातून शिवाजीमहाराजावर भालजीसाहेबांपासून तो मायजीसाहेबांपर्यन्त सर्वांनी सिनेमे काढले आहेत व अजूनही काढताहेत. नाही, भुताचा राजा शिवाजीवर सिनेमा नाही काढणार!" आता श्यामही राधासारखा भूतानच्याऐवजी 'भुतां'चा असा उच्चार करू लागला होता.

'मग कोण असेल बरं?' राधा.

'अग, ते असतील आपले प्रतिगांधी ज्यानी आपला जीव गाईंच्या जीवाकरता अर्पण करावयाची, तयारी दाखवली होती—उपास काय केले, तापास काय केले!' श्याम.

"नाही ते नसतील. आणीबाणीनंतर सर्व गोष्टींचा भाव वधारला असला तरी त्यांचा खाली गेला आहे. त्यांच्यावर कोण काढेल सिनेमा आणि कोण पाहील?" राधा म्हणाली. श्याम निरुत्तर झाला.

'हां, आपल्या काकावर काढणार असतील हा सिनेमा. काकाचे कार्य – त्यांनी मंत्री म्हणून सरदार पटेलाना केलेले सहाय्य. नेहरूंना ठणकावून बोलणारा. त्याना नेहरूसुद्धा घाबरत असत म्हणे. श्यामने आणखी एक नाव सुचवले.

'म्हणे म्हणजे काका स्वत:च म्हणे. त्याच्यावर सिनेमा काढायला भुताचा डायरेक्टर कशाला हवा? 'काकाचा वग' म्हणून आपले दादा कोंडकेसुद्धा छान सिनेमा काढतील. परवाच टी. व्ही. वर 'आंधळा मारतो डोळा' पाहून राधाचे दादाबद्दल मत खूप चांगले झाले होते.

आता परत दोघे विचारात पडले. आपल्या महाराष्ट्रात सिनेमा काढण्यालायक पुढारी नसावा ह्याचं त्या दोघांना खूप वाईट वाटत होते. तेव्हढ्यात दोघे जण एकदमच, 'अरे आपले ते हे असणार!' असे चक्क ओरडूनच म्हणाले. म्हणजे काय किंचाळलेच!

'आपण तरी कसे खुळे आहोत—महाराष्ट्राचा पुढारी म्हटल्यावर आपण शिवाजी संभाजी करत बसलो. पहिल्या झटक्यात आपल्या डोळ्यासमोर त्याची भव्य मूर्ती यावयास पाहिजे होती." श्याम म्हणाला.

'तुम्हीच वेगवेगळी नावे सुचवीत होतात!' राधा अगदी दोन मिनिटांपूर्वी आपणही जी काही सुचवली होती ते विसरून बिनधास्तपणे म्हणाली. खरं म्हणजे ह्या तिच्या बोलण्यावर श्याम चिडला होता; पण मघाशी म्हटलं ना, कोणत्याही कारणाकरता रविवारी राधाचा मूड बिघडवण्याचे तो टाळत असे.

'खरंच, चुकलंच माझं!' श्याम म्हणाला, 'वा! काय पण भुताच्या राजाने योग्य विषय निवडला आहे सिनेमाला!'

'होय ना. अगदी बाळपणासून सिनेमा योग्य जीवन. ते सांगली—कोल्हापूरकडचे बाळपण...' राधा सिनेमात दाखवतात तशा 'फ्लॅश-बॅक'च्या मूडमध्ये जाऊन म्हणाली. श्याम पण त्या मूडमध्ये जाऊन मिळाला.

'ती बेचाळीसची क्रांती, ते प्रति का पत्री सरकार...'

'मग ते उपमंत्रीपद, मग चढत चढत जाऊन मिळालेले मुख्यमंत्रीपद' राधा.

'मग ती संयुक्त महाराष्ट्राची कळशी आणणे!' श्याम आपणही कमी नाही आहोत हे दाखवण्याकरता म्हणाला.

'अहो कळशी नाही, कलश म्हणतात त्याला, असा समारंभाने वाजत—गाजत आणला म्हणजे! आम्ही पाणी भरतो त्या वेळी ती कळशी!' राधा.

'तेच हे पुढारी, वयाने लहान पण कर्तृत्वाने महान! आणि हिमालयाची हाक येताच धावले नेहरूना मदतीचा हात द्यायला!' श्याम.

'पण त्यांचा हात लागलाच नाही. नुसते त्यांचे नाव ऐकूनच चिनी पळाले घाबरून!' राधा.

'वा, काय छान सिनेमा होईल नाही? प्रथम सह्याद्रीचे दर्शन, मग सातपुडा मग अमुक मग तमुक!' श्यामचा भूगोल बाकी लोकांचा असतो तसाच कच्चा असल्याने हे अमुक व ते तमुक. 'मग ती हिमालयाची उत्तुंग बर्फमय शिखरे!'

'पण काय हो, सह्याद्रीपासून हिमालयापर्यंत मदतीला धावण्याची फिल्म चांगली पधरा—वीस दिवसाची होईल. कारण साहेब फार जोराने धावू शकले असतील असे काही वाटत नाही.' राधा.

'खुळीच आहेस !' श्याम ॲटनबरो पत्रकारांशी ज्या समजुतीच्या स्वरात बोलतो त्या स्वरात म्हणाला, 'अग, सगळंच दाखवायचं नाही काही सिनेमा म्हणजे काही इतिहास नाही. फक्त ' महत्त्वाचे ' टप्पे !'

'हं, मग ठीक आहे. मला वाटलं...' राधा.

'प्रथम संरक्षणमंत्री मग गृहमंत्री ... मग अमुक मग तमुक वा ! काय छान होईल नाही सिनेमा ?' श्याम.

'अगदी खरं, अतिशय छान होईल सिनेमा !' राधा आनंदात म्हणाली. आज कित्येक वर्षांत त्या दोघांचे एवढे शंभर टक्के एकमत झाले नव्हते; पण त्याला कारण त्यांचा जुळणारा स्वभाव नसून त्या मराठी पुढाऱ्याची मराठी मनावरची मोहिनी हेच होते, हे काय सांगावयास पाहिजे ?

मग राधा वर्तमानपत्राची दुसरी पाने वाचू लागली व श्याम वाङ्मयीन ' कांद्रा-पोहे ' खाऊ लागला. तेवढ्यात राधा म्हणाली, ' काय हो पण मी म्हणत होते !'

बायकांचा हा ' काय हो, पण मी म्हणत होते ' हा फार धोक्याचा असतो. एखादी गोष्ट चांगली दोन-अडीच तास घोळून घोळून चर्चावी व काही निर्णयाला यावं तेव्हा बायका असे ' काय हो, पण मी म्हणत होते ' म्हणून काही अगदी ' बेसिक ' मुद्दा काढतात व त्या सगळ्या चर्चेवर बोळा फिरवतात; पण त्यांचे हे म्हणणे ९९ टक्के खरे असते.

म्हणून राधाने ' पण काय हो, मी म्हणत होते' असे म्हटल्यावर श्याम राधाकडे गंभीर पणे पाहू लागला.

'ह्या भुतांच्या राजाला हा सिनेमा काढणं फार खर्चाचं होणार आहे नाही ?' राधाने गंभीरपणे विचारले.

'अग, कोणत्याही पुढाऱ्यावर सिनेमा काढावयाचा म्हणजे एवढा खर्च येणारच.' श्याम परत ॲटनबरोच्या भूमिकेत आला. हेच बघ ना ? सगळ्या कॉंग्रेसच्या चळवळीत जव्हढा खर्च झाला नव्हता तेव्हढा एका 'गांधी' सिनेमावर आला.

' तसं नव्हे हो, मी म्हणत होते की ह्या आपल्या मराठी नेत्याचे सगळे आयुष्य म्हणजे जवळजवळ पन्नास-साठ वर्षाचे आयुष्य कुंपणावर गेले. तेव्हा भुतांच्या राजाला केवढ्या मोठ्या भक्कम कुंपणाचा सेट करावा लागेल नाही ?'

श्यामला वाटले होते तेव्हढा काही महत्त्वाचा मुद्दा राधाने मांडला नव्हता. सिनेमा काढावयाचा म्हणजे खर्च येणारच आणि जर भुतांचा राजा खर्च करतच असेल तर आपण का उगीच जीव थोडा थोडा करा, हा मराठी विचार त्याने राधाला बोलून दाखवला.

थोड्या वेळाने राधाचे परत ' पण काय हो, मी म्हणत होते' झाले. आता मात्र राधाने अगदी 'बुनियादी' मुद्दा काढला असणार, अशी त्याची खात्री झाली व तो प्रश्नार्थक चेहऱ्याने तिच्याकडे पाहू लागला.

'साधारणपणे ' नसलेल्या ' पुढाऱ्यांवर सिनेमा काढतात ना ? पण आपले तर नेते अजूनी 'आहेत' !' राधा.

' ते खरं आहे, श्याम निश्वास टाकून म्हणाला, ' पण कदाचित आता ते असून नसल्यासारखेच झाले आहेत; ' म्हणून काढणार असतील त्यांच्यावर सिनेमा !' □

# पुस्तके

## जडणघडण

### कातर, पण सावध मनानं घेतलेला आयुष्याचा मागोवा

काही काही व्यक्तींशी आपला संबंध येत नाही; पण या ना त्या कारणानं, कशा ना कशामुळं तरी त्यांची एक विशिष्ट प्रतिमा आपल्या मनात तयार होत जाते. थोडं घासूनपुसून घेत गेलं तर अशी प्रतिमा वास्तवाच्या बरीच जवळची होऊ शकते. कारण पूर्ण जशीच्या तशी प्रतिमा दुरूनच काय, अगदी जवळून वावरतानाही हाती लागेलच, याची हमी नाही.

वामनराव चोरघड्यांच्या बाबतीत माझ्या मनात अशी दूरची प्रतिमाच साकार झालेली होती. मूळचे विदर्भातले आणि वामनरावांचे एके काळचे जिवलग मित्र (कै.) पु. भा. भावे यांच्या बोलण्यातून येणाऱ्या वामनरावांच्या आठवणी, ग. दि. मां. च्या ' तीळ आणि तांदूळ 'सारख्या पुस्तकातले वामनरावांबद्दलचे उल्लेख, चंद्रपूर साहित्यसंमेलनाच्या वेळचं वामनरावांचं वागणं-बोलणं आणि संमेलन संतप्त वातावरणात उधळलं जात असताना ' हे संमेलन संपल्याचं मी जाहीर करतो ' असं सांगून व्यासपीठावरून संथपणे खाली उतरून निर्भीडपणे चालायला लागणं, या साऱ्यातून या दूरच्या प्रतिमेला आकार येत गेला होता. स्वातंत्र्यसंग्रामातल्या त्यांच्या प्रामाणिक कार्यापासून महाराष्ट्र ग्रंथनिर्मिती मंडळाच्या संचालकत्वाच्या कार्यापर्यंत विविध प्रकारांनी काही काही कानांवर पडलं होतं. वामनरावांच्या साहित्यातून त्यामागचं मन थोडं-फार जाणवत होतं. कारण साहित्यात लेखकाला संपूर्णपणे शोधण्यात अर्थ नाही; पण तरीही शोधाच्या वाटेच्या खुणा सापडतातच, असं अनेकदा वाटतं. तसं काहीसं झालं असावं.

या धूसर प्रतिमेत असलेले वामनराव मनाशी घेऊनच मी ' जडण घडण ' हे त्यांचं आत्मचरित्र वाचत गेलो. पानामागून पानं उलटत गेलो आणि जाणवत गेलं– ते ' वामनराव कुठं तरी दूर राहिले आहेत. किंबहुना खुद्द वामनरावच आत्मकथा सांगताना आपल्या लघुकथेत असणारा नेमकेपणा, निखळपणा हळूच बाजूला ठेवण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक करत आहेत. हे खरं आहे का ? वामनरावच जाणे; पण संपूर्ण आत्मकथा वाचताना अनेक जागी ही शंका अडखळतच राहिली.

' वामनरावांनी बालपणापासून हकीकत

सांगितली आहे. घरची गरिबी, संस्कार, आई-वडिलांचे स्वभाव, ग्रामीण जीवन याच्या तपशिलातून एक चित्र ते उभं करायला लागतात. हळूहळू कथा रंगायला लागते आणि वामनराव स्वातंत्र्यलढयाच्या पर्वात उतरल्याचा उल्लेख येतो. त्यांच्या आयुष्यातला हा सर्वांत महत्त्वाचा कालखंड. याच कालखंडात त्यांना म. गांधी आणि 'माउली विनोबापासून भवानीप्रसाद मिश्रसारख्या कवीपर्यंत अनेक उत्तुंग माणसं जवळून पाहायला मिळाली. त्यांच्याशी जवळीक निर्माण झाली. या मोठ्या माणसांनी आयुष्यात त्यांच्यावर छोटे-मोठे संस्कार केले. न कळत केले. खरं म्हणजे वामनरावांच्या आयुष्याची मुख्य वैचारिक शिदोरी त्यातच सामावलेली आहे. त्यामुळं एवढ्या महत्त्वाच्या कालखंडाबद्दल वामनराव ऐसपैस लिहिणार हे स्वाभाविकच आहे. एका विलक्षण भारावलेल्या अवस्थेत, भक्तिभावानं ते या कालखंडाचं चित्र रेखाटत जातात आणि मागच्या पुढच्या कालखंडाचा अकारण किंवा हेतुतः संक्षेप करून टाकतात. त्याबद्दल विस्तारानं, खोल जिव्हाळयानं ते लिहीत नाहीत. त्याचा फार तपशील ते देत नाहीत. त्यात मुख्यतः सापडतात ते स्वातंत्र्यलढयाच्या पर्वातले. धडाडीनं जीवावर उदार होऊन काहीही त्याग करायला तयार असलेले, गांधीजी-विनोबांच्या प्रभावानं भारून गेलेले वामनराव. हे रूप लोभसवाणं आहे, मोहवणारं आहे, यात शंका नाही; पण ते त्यांचं पूर्णरूप नाही. त्यात मला कथाकार वामनरावांचं रूप सापडत नाही: कोशकार-पाठ्यपुस्तककार चोरघडे दिसत नाहीत. महाराष्ट्र ग्रंथनिर्मिती मंडळाचे संचालक, लोकसाहित्याचे अभ्यासक वामनराव चोरघडे त्यात वरवरचं काही सांगून जातात आणि मग निर्भय, निखळ वामनराव सापडेनासे होतात. शोध घेता घेताच ते हरवत असल्याची जाणीव व्हायला लागते. या साऱ्यात जाणवतं ते सत्तरीच्या छायेतलं, कातर झालेलं मन. या मनानंच आयुष्याचा हा मागोवा घेतल्यामुळं हे असं झालं असेल का? वार्धक्याच्या काळात फारशी गुंतागुंत नको, मतभेद नकोत, झालं गेलं विसरून गेलेलं बरं अशी काहीशी मनाची अवस्था होत असावी. 'जडणघडण' भर त्याची छाया पसरलेली आहे.

अशा कातर अवस्थेत, पण काय सांगायचं-काय नाही, याच्या सावध विचारातून ही आत्मकथा साकारली आहे. जे सांगायचं आहे, त्याच्या बाबतीत विलक्षण भारावलेपण आहे. ४२ चा तुरुंगातला कालखंड, विनोबांचा सहवास, शाळेतलं जीवन, स्वातंत्र्यलढयातला सर्व सहभाग याबद्दल हे भारावलेपण आहे. मग त्याबद्दल किती सांगावं आणि किती सांगू नये, असं त्यांना झालं आहे. त्यामुळं अगदी बारीकसारीक तपशिलापासून याबद्दल ते बरंच काही सांगत जातात. त्यामुळं त्यात भक्तीचा सूर येतो आणि मग तटस्थता, निर्लेपता हरवत जाते. हे हरवणं मोहक आहे; पण प्रेमविवाहासारखा थोडासा अपवाद वगळता इतर आठवणी सांगताना मात्र असे हरवलेले वामनराव दिसत नाहीत. कधी ते 'इथेच मला सलमा भेटली' 'ल्यूसीचा सहवास मला इथेच लाभला' 'दहा-बारा स्त्रिया माझ्या आयुष्यात येऊन गेल्या', 'पत्रीसरकारचं दर्शन मी घेऊन आलो,' 'हेडगेवारांच्या पायांना वंदन करून मी संघ सोडला' अशासारखे ओझरते उल्लेख करतात, तर कधी महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळाच्या कामात 'पहिल्या वर्षभरात माझ्या 'मित्रां'नीही मला त्रास दिला नाही,' 'कुठून तरी बुद्धी झाली. १९७९ चा अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचा मी अध्यक्ष झालो. ७ जानेवारी १९७९ ला व्यासपीठावरून खाली उतरलो आणि लेखन सोडून दिले.' अशासारखे महत्त्वाच्या घटनांबाबतचे फुसट-ओझरते उल्लेख करून जातात. त्याबाबत अधिक काही सांगायचं नाही, असंच जणू त्यांनी ठरवलेलं आहे. म्हणजे प्रकारात भारावलेपणामुळं आणि इतर घटनांच्या बाबतीत सावधपणामुळं तटस्थता, निर्लेपता उरत नाही. 'अलिप्तपणा खूप लिप्त करून जातो', असं वामनरावांनीच म्हटलं आहे. त्यांच्या स्वतःच्याच बाबतीत तसं झालं आहे का? असावं, असं वाटतं.

कदाचित असंही असेल की, त्या झपाटलेल्या कालखंडातून वामनराव मनानं बाहेर पडलेलेच नसतील. 'इकडची दुनिया पार तिकडे' करून टाकणाऱ्या त्या कालखंडातच ते रमले असावेत आणि नंतर एकदम वार्धक्याच्या सावलीतच उतरले असावेत. म्हणूनच ती काही वर्षं ओलांडली की एकदम ते चिंतन-आत्मचिंतन, अध्यात्म, प्रचीती अशा गूढाकडे, आदिम शोधाच्या ओढीकडे झेपावतात. मधला कालखंड चार रेघोट्यांच्या आलेखात उभा करावा, तसा सांगून जातात. व्यक्तिगत जीवनातले कौटुंबिक ताण-तणाव, सामाजिक ताण-तणाव, कटु अनुभव सांगायचं ते आवर्जून टाळतात. एखाद्या वेळी सांगायला लागलेच तर 'नाव-गावाचा मी उल्लेख करत नाही' असं आधीच सांगून मोकळे होतात. याचा अर्थ त्यांनी कुणाकुणाच्या भानगडी सांगत बसाव्यात असं नाही; पण एवढ्या अनुभवसमृद्ध आयुष्यात आलेले तसे अनुभव मर्यादा सांभाळूनही सांगणं आवश्यक होतं; पण एकूणच हे सारं त्यांनी टाळलं आहे, असंच म्हणावं लागतं. साहित्यक्षेत्रात एवढा प्रदीर्घ काळ आघाडीवर राहूनही साहित्यविचार, निर्मितिप्रक्रिया याबद्दल ते फारसं लिहीत नाहीत. शिक्षणक्षेत्रात काम केलं त्याबद्दलचे ओझरते अनुभव सांगतात. नाट्यपरीक्षण मंडळावर ते असताना 'सखाराम बाइंडर' हे नाटक मंजुरीसाठी आलं होतं याचा उल्लेख आहे. तसाच चंद्रपूरच्या साहित्य-संमेलनाचाही. सामाजिक-सांस्कृतिक-साहित्यिक क्षेत्रात गाजलेल्या या दोन ठळक घटनाचे वामनराव प्रमुख साक्षीदार होते, स्वतः त्यात गुंतलेले होते; पण तरीही त्याबद्दल ते काहीही भाष्य करत नाहीत, सांगत नाहीत. महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ ही एक मोठी चळवळ होती. गाजलीही; पण तिच्या खोलात ते जात नाहीत. आपण अनेक कामं केली; पण पैसे खाल्ले नाहीत, अशा आशयाचं विधान ते विविध संदर्भात दोन-तीनदा करतात; पण त्याबद्दल अधिक स्पष्टपणानं बोलत नाहीत. असं का असावं? भीतीपेक्षा वार्धक्यछायेचा यात जास्त वाटा आहे का? असेलही; पण तो टाळून त्यांनी अधिक मोकळेपणानं याबद्दल लिहायला हवं होतं.

वामनरावाच्या आत्मचरित्राबद्दल एवढा अपेक्षाभंग नोंदवताना एक गोष्ट आवर्जून नोंदवली पाहिजे. ती म्हणजे हा अपेक्षाभंग एका विशिष्ट पार्श्वभूमीवरचा आहे. एवढं अनुभवसमृद्ध, कार्यसमृद्ध आयुष्य वामनराव जगले आहेत म्हणून या अपेक्षा करता येतात. म्हणूनच त्याच्या बाबतीतला हा अपेक्षा-

भंगही अनेकांच्या संपूर्ण चरित्रांपेक्षा मोठा आहे. या अपेक्षाभंगातूनही जे मिळत ते फार वेगळं, मोहक अनुभवघन आहे. फक्त ते हवं होतं त्यापेक्षा कमी मिळालं, एवढीच याबाबतीत तक्रार आहे.

### बुद्धिवाद्यांचा नपुंसकपणा

एका अर्थानं 'हर्ष-खेद ते मावळले' अशा अवस्थेकडे निघालेल्या चिंतकाचं हे आत्मचरित्र आहे, असं म्हणता येईल, पण हे त्यांचं आजचं रूप असेल. आत्मचरित्र लिहिताना अशी आजची मनोवस्था पूर्वलक्षी पद्धतीनं लागू करावी, असं मला वाटत नाही. काही काही वेळा तर वामनरावांनी जाणीवपूर्वक तसा प्रयत्न केलेला दिसतो.

विशिष्ट व्यक्तीविषयी त्यानी परखडपणानं मतप्रदर्शन किंवा अनुभव-कथन केलं नसलं तरी आजच्या सामाजिक-शैक्षणिक स्थितीबद्दल मात्र ते तळमळीनं बोलत राहतात. स्वातंत्र्यपूर्वकाळ आणि स्वातंत्र्योत्तर काळ यातला बदल मोजक्या शब्दात टिपतात. नेमक्या शब्दात आपली अस्वस्थता नोंदवतात. 'सध्या तर समृद्धीच्याच आधिव्याधी, उपाधी सुरू झाल्या आहेत. 'स्वातंत्र्यानंतर सर्व पोपट (राजकीय नेते-कार्यकर्ते) उडून शहरात आले, त्यांनी आपल्या वाणीत उच्चारलेले शब्द वृत्तपत्रांत छापून येऊ लागले, 'लोकांची स्मरणशक्ती क्षणाची असते, हे ते (कन्नमवार) जाणत होते आणि आम्हा भारतीयांना स्मरणशक्तीच नाही ही तर त्याची खात्री होती. कारणे कोणतीही असोत, पण आम्ही गांधीना, नेहरूंना किती लवकर विसरून गेलो. त्याअगोदरची थोर माणसे तर पुस्तकात आहेत, म्हणूनच आठवावी लागतात." 'भारताला एकच शाप १८८५ पासून भोवला आहे आणि तो म्हणजे बुद्धिवाद्याचा नपुसकपणा ! करणार काही नाहीत, चिकित्सा, मीमासा, चोथा चघळणे, शास्त्र आणि विज्ञान याचा आधार देणे, इतरांना काही करावे असे सागणे, झाले तर दोष देणे, झाले तर चागले झाले नाही असे म्हणणे आणि परत वाचाळपणा करणे. जगाच्या पाठीवर इतका नपुसकवर्ग अन्यत्र नाही.' 'दुर्दैव असे की, त्या वेळी भारतात वेडेच जास्त होते, कारण पारतंत्र्य होते ! आता सारेच शहाणे दिसतात– अरे, प्रत्येकाचे विचार वेगळेवेगळे व ते केवळ दुसऱ्याला सांगण्यासाठी !' अशी अनेक अवतरणं देता येतील.

स्वातंत्र्यलढ्यातल्या अनुभवांच्या अनुषंगानं कुठलाही महान कार्य केल्याचा आव न आणता वामनरावांनी आपली ही व्यथा नोंदविली आहे आपण केलेलं कार्य हे नगण्य होतं, असा थोडा जास्तच विनम्रपणा त्यानी धारण केला आहे। पण त्यांचा त्या वेळचा झपाटा आणि धडाडी सलाम करण्यासारखी आहे. त्या पिढीच्या त्या काळाशी, झपाटलेल्या तेव्हाच्या व्यथा-वेदनाशी आम्ही आज समरस होऊ शकत नाही; पण वामनरवांचे हे अनुभव त्यातला थरार मात्र जाणवून देण्याइतके समर्थ उतरले आहेत. वामनरावांनी एवढाच भाग अधिक संयोजनपूर्वक आणि विस्तारानं लिहिला असता तरी हवा होता, असं वाटण्याइतकं सामर्थ्य त्यात आहे.

स्वातंत्र्यलढ्याच्या अनुषंगानं त्यानी अनेकाच्या आठवणी दिल्या आहेत, व्यक्तिचित्रं रेखाटली आहेत. इतर संदर्भात आलेल्या भालेराव मास्तर, मलंग बुवा, सी. रामचंद्र, पु. भा. (बाळ) भावे, पूर्वीचे बाबा आमटे अशा छोटया-मोठया व्यक्तिरेखा त्यानी उभ्या केल्याच आहेत; पण स्वातंत्र्यलढ्याच्या अनुषगानं रेखाटलेल्या फॉरेस्टर, जनरल आवारी अशासारख्या विविध व्यक्तिरेखा जिवंत केल्या आहेत. त्यातच आज वेगळ्या पद्धतीनं माहीत असलेल्या, 'सरकारी संत' म्हणून हिणवलं जात असलेल्या विनोबाचं मोठं मोहक, विचार करायला लावणारं दर्शन वामनरावानी घडवलं आहे. ठायी ठायी विनोबाचे संदर्भ आले आहेत. कारण 'विनोबाची सावली लाभली हो आयुष्यातली सर्वात मोठी कमाई आहे,' अशी वामनरावाची भावना आहे. कोणताही शब्दजंजाळ निर्माण न करता साध्या साध्या प्रसगामधून त्यांनी विनोबाजीच्या मोठेपणाचं, त्याच्यातल्या मूलगामी तत्त्वचिंतकाचं 'नामरूपातीत' चित्र उभं केलं आहे. नव्या पिढीपुढं हे विनोबा जवळजवळ आलेच नाहीत. 'विनोबापुढं नुसतं बसून रहाणं मनाला पावन करून टाकतं. विनोबाकडं विनोबा म्हणूनच जायला हवं. आपल्या कल्पनेतला एक पुरुष म्हणून त्यांच्याकडे जाणं हा प्रज्ञावाद आहे प्रज्ञा नव्हे. म्हणूनच 'विनोबा हे सरकारी सत आहेत,' 'विनोबाजवळ बोलण्यासारखं काही नव्हतं, म्हणून त्यानी मौन स्वीकारलं आहे,' असं आपण म्हणणं म्हणजे आपण कोणत्या पायरीवर आहोत हे प्रकट करणं होय,' या शब्दात त्यानी विनोबांबद्दलच्या आजच्या प्रवाहाचा समाचार घेतला आहे. त्यानी दिलेल्या छोटया छोटया हककतीमधून हीच जाणीव आपल्या मनात उमटल्याशिवाय रहात नाही. 'जडण-घडण' चं हेही एक मोठं यश म्हणायला हवं.

महाराष्ट्राच्या सास्कृतिक, साहित्यिक, शैक्षणिक जीवनाचा प्रदीर्घ काळ सक्रीय साक्षीदार असलेल्या एका दिलदार, बलदंड माणसाचं हे आत्मचरित्र ! शैलीदार, तुटक वाटणारं; पण अनुभवसमृद्धतेनं मन समृद्ध करणारं. 'आधी, उपाधी खरोखरच निरवल्या गेल्या आहेत. खरं म्हणजे त्याच कामाला लावतात आणि स्वत: मात्र जशाच्या तशा कायम राहतात. आधी, व्याधी, उपाधी अजूनही आहेतच; पण कर्मवृत्ती पार मेली आहे. मन सशाच्या पाठीसारखं कुरवाळानं देखील थरथरू लागते. आजवर दु:खानसुद्धा ते फुरफुरले; पण आताची थरथर असह्य झाली आहे. सर्व सोडून देता येईल, अशा स्थिती असली तरी सोडता येत नाही आणि जोडण्याची शक्ती बधिर झाली आहे,' या अवस्थेत साकार झालेलं.

वामनरावानी एका ठिकाणी म्हटलं आहे, 'टागोराचं एक वाक्य मी नवव्या इयत्तत पाठ केल होत. 'पुस्तकं म्हणजे निर्जीव वस्तू नसतात. त्यात लेखकाच्या आत्म्याचं सुष्ठु दर्शन घडतं.' हे वाक्य माझ्या जडण-घडणीच्या उमेदीतच माझ्या मनात ठसलं होतं. परिणाम म्हणजे लेखकाच्या ललित लेखातून त्याच्या चरित्रखुणा मला ओळखायला येऊ लागल्या. याच दृष्टिकोणातून मी पुष्कळाची आत्मचरित्रं वाचली. ती प्रत्यक्ष लेखकानं लिहिला असली तरी त्यातील पुष्कळ गोष्टी त्याच्या लिखाणाशी विसंगत वाटल्यामुळं खोटया वाटल्या. निदान त्या जपून लिहिल्यासारख्याच वाटल्या.' 'जडण-घडण' वाचल्यावर हीच भावना मनात निर्माण होते. हे यश की अपयश ?

—विजय कुवळेकर

**जडण-घडण**
**वामन चोरघडे**
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे
पृष्ठे ३२० + ४ (छायाचित्र-पृष्ठे),
किंमत : तीस रुपये.

फिनिक्स निवड

# Unfinished Business

Pressure Points in the lives of women

By Maggie Scarf

एक वाचनीय पुस्तक लवकरच आमच्या फिनिक्स ग्रंथालयात दाखल होणार आहे. त्याचे नाव असेल 'अनफिनिश्ड बिझिनेस : प्रेशर पॉइंटस इन द लाइव्हज ऑफ वुमेन.' ते पुस्तक 'मेगी स्कार्फ' या बाईंनी लिहिले आहे. या पुस्तकाचा विषय आहे स्त्री. स्त्री ही पुरुषापेक्षा अधिक खिन्न होते, उदासीन होते असे या बाईंना आढळून आले. मला शॉक बसला. आमच्या ग्रंथालयात कामाला सर्वच स्त्रिया. आता मला कळलं, सतत स्त्रियामध्ये राहून डीप्रेशन endogenous झालं आणि गंमत काय बघा. त्या मला नावे ठेवतात! सर रागीट, चिडखोर वगैरे! पॅरॅनॉइड. हसूही देत नाहीत. सालं या जगात सारा उलटा कारभार! वास्तवता म्हणजे मिरर इमेज. डावं उजवं भासतं, उजवं डावं!

इन द फर्स्ट प्लेस मी स्त्रियांचा भरणा का करतो याबद्दल लोकात कधीकधी चर्चा चालू असते. त्याचा अर्क माझ्या कानावर येतो; पण मी दखल घेत नाही. आपलं काम बरं की आपण बरे असा आव आणतो, बुरखा घालतो. काही म्हणतात हा स्त्रियाचं शोषण करतो (आता खिन्नतेचा मला संसर्ग लागला त्याचे काय? जाऊ दे, जगात न्याय आहे कुठे?) कुणी म्हणतात स्त्रिया कमी पगार घेतात म्हणून हा भरणा. काहीना वाटतं स्त्रिया कमी भाडतात (?) व मला भाडणाची ॲलर्जी आहे म्हणून बायांची रिक्रुटमेंट! आणखी एक गट असा मानणारा आहे की, स्त्रिया चोरी कमी करतात व मला पुस्तकांच्या चोरीचा इतका धसका आहे की मी पुरुष ठेवणं शक्यच नाही! हे चिपको आदोलन नव्हे. झाडालाच मिठी मारून झाड मला सोडत नाही वगैरे!!

एकदा एका वाचकाने तर कहरच केला! (नाव देत नाही; पण डायरीत आहे) तो मला म्हणाला, 'तुम्हीच एकदा "माणूस"-मध्ये लिहिले होते की, सार्त्र (आपला भ्राता –ज्यॉ पॉल–sic) काहीही करीत असताना त्याच्या सुप्त मनात एकच विचार असे. स्त्री. तुम्हालाही जीनियस म्हणून मिरवायचे आहे म्हणून तुम्ही त्याची कॉपी करता!' हे ऐकून *मी अगदी लाल झालो*; पण *त्याला* डेसमंड मॉरिसची बॉडी लॅंग्वेज माहीत होती! 'मॅन वॉचिंग'मध्ये एकदा मॉरिस म्हणाला होता, 'रागाने लाल झालेली माणसे हल्ला करीत नाहीत. पांढरीफटफटीत (म्हणजे रागाने झालेली) माणसेच हल्ला करतात!'

आणि कुजबूज बघा, 'अहो' त्याची एक असिस्टंट इतकी स्मार्ट आहे की तीच जवळ-जवळ ग्रंथालय चालवते. हा आपला वाचीत बसलेला असतो.' तशी आमच्याकडे पोलीसमंडळी कमीच; पण पूर्वी ४–६ बडे अधिकारी यायचे. याच संदर्भात माझे एकाशी बोलणे झाले होते. *त्या* इन्स्पेक्टरला वाटत होते, की, तिच्यामुळेच फिनिक्सची चाके हालतात. मी एक खडा टाकला व त्याला म्हणालो, 'ती फार एफिशंट आहे. परवाच मला तिने एना कॅरनीनाचा अर्थ विचारला!' क्षणभर तो गोंधळला; पण क्षणभरच. मग त्याच्या नेहमीच्या अधिकाऱ्याच्या व भारदस्त आवाजात म्हणाला, 'इतक्या प्रख्यात नटीचं नाव....'

असेही काही म्हणतात की, त्याला अधिक गिन्हाईक आकर्षित करायचंय...!

झालं. डायग्रेशन हा आमचा स्थायी स्वभाव; पण बघा स्त्रियाविषयीचे पुस्तक म्हणून मी स्त्रियांविषयी लिहिले तर फारसं वाईट डायग्रेशन होणार नाही. डायव्हर्शन होईल फार तर....

तुमचं होईल डायव्हर्शन; पण माझे हाल!! ... खरंच मला वाटत होतं, इतकी किलबिल, इतकं हास्य, इतकी किणकिण, इतकी *लिपस्टिक*, इतकं *व्हॅनिशिंग* क्रीम, इतका मेक-अप आणि इतकं डीप्रेशन! थोडा वेळ मला वाटलं की लेखिकेचे निष्कर्ष चुकले असतील; गैरसमज झाला असेल. तिनं संख्याशास्त्रात गुरफटून चुका केल्या असतील; पण नाही. मी या पुस्तकाविषयी जशजशी अधिक माहिती गोळा करू लागलो तसतसं मला असं आढळून आलं की, तिनं विषय चांगलाच अभ्यासला आहे. एक बरं झालं बाबा लिहिणारीही स्त्री! म्हणजे या पॉइंटवर स्त्री-मुक्तिवाल्याची तोंडं बंद!

पण नेमका याच पॉइंटवर मी काउंटर मार खाल्ला! ही अनफिनिश्ड बिझिनेसवाली मेगी स्कार्फ काय म्हणते– तर आपला समाज पुरुषप्रधान आहे म्हणून स्त्रियात खिन्नता endogenous असते नव्हे झाली आहे. मला जी. ए. केंचे दुर्गंधरस आठवले. दुसऱ्या टोकाला आनंद यादवाची विदग्ध पातळी आठवली–स्पर्शकमळेमधली. रीचर्ड रेस्टॉकचे 'द ब्रेन' (माणूस २७-१२-१९८०) पुस्तक आठवले. त्यात स्त्रियांचा मेंदू वेगळ्या रीतीने कसा काम करतो वगैरे लिहिले आहे.

मेगी स्कार्फना संशोधनात एक गोष्ट निःसंदेह आढळून आली. स्त्रियांत जास्त खिन्नता–उदासीनता असते. ती across the board असते. म्हणजे सर्व स्तरात व थरात. उच्चवर्गीय, मध्यमवर्गीय, कनिष्ठ मध्यमवर्गीय व लो क्लासमध्ये. शेवटी विटाळासारखा हा एक बायोलॉजिकल शापच म्हणावा लागेल!

काही स्त्रियाच्या बाबतीत उदासीनता व *खिन्नता ही शरिराच्या असंतुलित रासायनिक* क्रियेमुळे घडू शकते. असली उदासीनता नवनव्या सायकॉट्रापिक औषधामुळे कमी किंवा नाहीशी होऊ शकते, तर इतर काही स्त्रियांची उदासीनता भोवतालच्या परिस्थितीमुळे (उदाहरणार्थ सासू-नणंद-दीर–भाडण) घडू शकते. असल्या उदासीनतेवर 'सायकॉट्रापिक' औषधाचा जवळजवळ शून्य उपयोग होतो.

औदासीन्य व खिन्नतेवर टॉफ्रानील लिथियम, पार्नेट नार्डील, अशा बऱ्याच गोळ्या आहेत; पण कधीकधी खुद्द अनुभवी डॉक्टर्सना ही औषधे मॉनिटर करणे अवघड होऊन बसते असे सौ. मेगी स्कार्फ म्हणतात. म्हणून खाजगी व्यक्तीने त्यावर प्रयोग न केलेले बरे. मेंदूत इतकी रसायने व enzymes असतात आणि एकमेकांवर ती इतकी असर करतात की ही औषधे मॉनिटर करायला कधीकधी वेळ लागतो. एका रसायनामुळे दुसरे फेनक द्रव्य (enzymes) तयार होते. *शिवाय हे दुसरे फेनक द्रव्य तिसरीच रसायन*-क्रिया चालू करते. असे हे न संपणारे चक्र मृत्यूपर्यंत चालूच असते.

आता शेवटी कॅडबरी, अमूल–साठेची ब्रीफ घेतो. निर्व्याज. चोकॉलेटमध्ये फेनीलेलेमाइन का असे काही द्रव्य असते. (इतर कोणते amine असेल; पण चॉकलेटमध्ये हे निश्चित.) स्त्रियानी अधिक चॉकलेटस् खाव्या. म्हणजे ज्याचे मिस्टर LIC मध्ये किंवा इतर हाय पोस्टवर असतील त्यांनी किंवा (अर्थात) ज्या मिळवत्या असतील त्यानी. आता चॉकलेट्स खाऊन त्याना अपराधी वाटण्याचे कारण नाही!

– जे. एन् पोंडा

# चित्रपट

# भरमसाठ तुटीचे करमणूकपत्रक

## 'झटपट करू दे खटपट'

झटपट करू दे खटपट असं थोडसं विनोदी वळणाचं पण वात्रट नाव असलेला चित्रपट येतोय म्हटल्यावर उत्सुकता बळावणं साहजिकच आहे. आधीच आमच्या मराठी चित्रपटसृष्टीत खास 'तमाशी' वळणाच्या चित्रपटांवर दादा कोंडकेस्टाईलच्या चावट, काहीशा अचकट व 'ग्राम्य' बिनोदी चित्रपटांनी इथल्या मराठी प्रेक्षकांना भुरळ घातली, ग्रामीण प्रेक्षकांनी तर त्याचं अतोनात स्वागत केलं, पण 'हळदी-कुंकू', चिमणी पाखरं' अशा उंबऱ्याच्या आतल्या सामू-सुनांच्या, नात्या-गोत्यांच्या रटाळ चित्रपटाला कंटाळलेल्या शहरी प्रेक्षकांनीही दादा कोंडकेंना उचलून धरलं. लागोपाठ आठ चित्रपटांचे 'सुवर्णमहोत्सव' करून दादांनी मराठीत रेकॉर्ड ब्रेकच केलं. पब्लिकची नाडी दादांनी ओळखली आणि पकडली. दादा यशस्वी ठरले. (व्यावसायिकरित्या) आता ह्याच स्टाइलची मिळती-जुळती कथा घेऊन गोजमगुंडेंचा 'झटपट' चित्रपट आहे, हे कळल्यावर इथल्या प्रेक्षकांची उत्सुकता ताणली गेली नाही तरच नवल! त्यात गोजमगुंडेंनी आपली जमीन वगैरे गहाण टाकून हा चित्रपट तयार केला. तो सुद्धा निव्वळ व्यावसायिक दृष्टी ठेवून त्यातच औरंगाबादला या चित्रपटाच्या पोस्टर्सवरून बराच गदारोळ माजला 'स्त्री-देह प्रदर्शन विरोधी' बॅनर घेऊन स्त्री-मुक्तिवाल्यांनी मोर्चाची धमकी दिली. गोजमगुंड्यांनीही आकांडतांडव केलं. निषेध, प्रतिक्रिया, समर्थन ह्या मुळे चित्रपट गाजला (का जगविला गेला?) गोजमगुंड्यांना हवं होतं तेच झालं- प्रसिद्धी भरपूर मिळाली आणि त्यातूनच 'प्रादेशिकते'चं समर्थन झालं.

पुणे, मुंबई, कोल्हापूर ही चित्रपटनिर्मितीची मक्तेदारी ! तिथून 'कॅमेरा मराठवाड्यातील माणसाच्या हातात गेला हे योग्यच झालं ! मराठवाड्यातील पाच चित्रपटांची निर्मिती पैशामुळे व इतर काही कारणांमुळे अर्धवट अवस्थेत राहिली. या पार्श्वभूमीवर गोजमगुंड्यांनी जिद्दीने 'मराठवाड्यातील' चित्रपट पूर्ण केला, हे कौतुकास्पदच आहे. दोन वर्षापूर्वी विदर्भातील एका प्राध्यापकाने गाडगेमहाराजांच्या जीवनावरील 'देवकीनंदन गोपाला' ह्या चित्रपटाची निर्मिती केली होती. या चित्रपटातला जरी यश मिळालं नाही तरी चित्रपट चांगला असल्याची पावती सर्वांनीच दिली. पण 'गोपाला' बाबतीत निर्मिती करणारा फक्त विदर्भातला होता. 'झटपट करू दे खटपट'ला मात्र निर्माता, दिग्दर्शक, लेखक, अभिनेता श्रीराम गोजमगुंडेनी 'चावटीका' फेम प्रा. फ. मु. शिंदे यांच्या गीतांवर साज चढवायला मराठवाड्यातलाच गायक राजा काटे याला संगीतकार म्हणून निवडलं व सरला आणि शलाका या दोन नायिका वगळता तंत्रज्ञ कलाकारांमध्ये मराठवाड्यातील मंडळींनाच प्राधान्य दिलं. बरंचसं चित्रीकरणही लातूरच्या परिसरात उरकण्यात आलं. त्यामुळं खऱ्या अर्थानं हा 'मराठवाड्या'चा चित्रपट ठरतो हे खरंच, इथे चित्रपटनिर्मितीला प्रोत्साहन दिलं पाहिजे, हेही योग्यच. बँक ऑफ महाराष्ट्राने या चित्रपटाला कर्ज देऊन ही कामगिरी पार पाडली तेही चांगलंच झालं.

परंतु या पार्श्वभूमीवर उत्सुकतेपोटी आपण चित्रपट पाहावयास गेलो तर... कळविण्यास अत्यंत वाईट वाटते की, हा चित्रपट अत्यंत 'भिकार' आहे. चित्रपटातील बीभत्स मिठ्यांचं दृश्य पाहून प्रेक्षक चित्रपटाला गर्दी करतात आणि त्याच त्याचपणाला कंटाळून बाहेर पडतात.

चित्रपटाची कथा नेहमीचाच मालमसाला वापरून भरलेली. पांचट आशय असलेली गाणी, सातत्यानं द्व्यर्थी शृंगारिक संवाद आणि दर क्षणी सरला-शलाका या नटघांच्या 'भरगच्च पण कमनीय (?) बांध्या'पाशी रेंगाळणारी दृश्यं यातून ठरलेल्या वेळात कथासूत्र गोवण्याचं संकलन गोजमगुंडे करतात.

कथेत देशमुखांच्या एकुलत्या एक मुलीचा (सरला येवलेकर) व त्यांच्या घरी नोकरीच्या शोधात आलेल्या 'किशन्या' (श्रीराम गोजमगुंडे) यांचा अप्रत्यक्ष असा मधाळ, मोहक वगैरे काय म्हटलं आहे तसा प्रणय आणि ग्रामीण ठेका व ग्राम्य शब्दांची लचक असलेली 'धुंद-फुंद' गाणी दाखवली आहेत. देशमुखाचा खून झाल्याने मुलगी आणि किशन्या खुन्याच्या शोधास निघतात खून करणाऱ्याचा शर्ट सापडल्यामुळं ते शिंप्याकडे शर्टाच्या आतल्या माणसाची चौकशी करतात. पुढं जोडा, सोन्याचं लॉकेट सापडल्यामुळं ते चांभार, सोनाराकडे जातात. (बहुधा गोजमगुंडेंना बलुतेदारी पद्धतीविषयी उद्बोधक ' माहितीही द्यायची असेल) प्रेक्षकही एकदा नाव्ह्याकडे, कुंभाराकडे पाहून ओरडतात; पण चित्रपट पाहिल्यानंतर होणारी निराशाच प्रेक्षकांच्या पदरी पडते गोजमगुंडे सोनारापाशी बलुतेदारी संपवितात आणि खुन्याचा शोध लागतो. चित्रपट संपतो.

यातला नायक 'किशन्या' हा दादा कोंडकेंच्या चित्रपटांप्रमाणेच भावडा, बावळट दाखविला आहे; पण दादांची नक्कल करणं गोजमगुंडेंना अवघड गेलं आहे. अभिनयाच्या बाबतीत इतर कलावंत मग नवखे असोत किंवा सरावलेले असोत, चित्रपटात मात्र

अभिनयाच्या दृष्टीने 'शून्य' भर घालतात. शलाका आणि सरला येवलेकर चित्रपटभर कॅमेऱ्याचे 'लक्ष्य' असतात. त्या दोघींपेक्षा त्यांचं अंग दाखवायलाच गोजमगुडेंचा लंपट 'कॅमेरा' चटावलेला दिसतो. 'मिठ्या' मारण्याच्यासुद्धा विविध लकवी, ढबी असतात. याचा 'प्रशिक्षणवर्गच' इथं तीन तास चालविला जातो. 'दिसली बाई की मार धडक' अशा पद्धतीनंच इथला नायक-नायिकेला मिठ्या मारतो नायिकेच्या अंगाला स्पर्श करण्यासाठी दिग्दर्शकांनी अनेक क्लृप्त्या, युक्त्या योजल्या आहेत. कधी नायिकेचे पाय दुखतात, तर कधी हात दुखतात. कधी नायिकेच्या अंगावर 'मुंगळा' चढतो, तर कधी तिला ओलेती केली जाते. अशा पद्धतीने 'मिठ्यांचे सत्र' चालूच असते.

कामोत्तेजक, उत्तान अंगप्रदर्शन करण्याचा दक्षिणेकडी 'ल चित्रपटातला खाक्या इथंही दिसतो आणि गोजमगुडे त्याचंही समर्थन करतात. ते म्हणतात 'अश्लीलता' ही 'व्यक्ति–सापेक्ष' आहे; आणि या चित्र–पटाच्याबाबतीत ते खरंही आहे. कारण 'मिठ्यांचं सत्र' चालू ठेवण्याचं काम गोजमगुड्यांनीच घेतल्यामुळं 'गोजमगुडे' या व्यक्तीपुरतीच ती मर्यादित राहते.

या खुले आम 'अश्लीलते' बरोबरच चित्रपटात खसखस पिकविण्यासाठी द्वयर्थी अशा शृंगारिक संवाद व गाण्यांची रेलचेल आहेच. 'कोंडके फॉर्म्युल्या' ची ही सहीसही नक्कल असूनसुद्धा शेवटी ती नक्कलच ठरते. दादांच्या द्वयर्थी संवादामध्ये चावटपणा, वात्रटपणाबरोबर 'विच्छा' परंपरा पाठीशी असल्यामुळं काही वेळा प्रासंगिक अशी राजकीय 'कॉमेंट' ही ते करतात. इथं त्याबाबत अंधारच आहे. उलट संवाद असेच बोलायचे किंवा अशासाठीच बोलायचे की, त्यातून फक्त 'अश्लील क्रिया–प्रक्रियांनाच 'खतपाणी' मिळेल. गाण्यांचीही तीच गत आहे.

इतके सर्व असूनही गोजमगुड्यांनी प्रथमच मराठमोळी अशी विशिष्ट हेलकावे खाणारी 'मराठवाडी' भाषा वापरली आहे. त्याला साजेल असं सुयोग्य चित्रीकरण आहे; पण अत्यंत तुटपुंजी अशी ही जमेची बाजू धरूनसुद्धा आपले तीन तास मात्र फुकट 'खर्च' होतात आणि 'झटपट' चं करमणूक अंदाजपत्रक ठरतं.

पण याचा अर्थ या चित्रपटाला व्यावसायिक यश मिळणारच नाही; असा मात्र नाही. याचं कारण करपरतीच्या योजनेमुळं पुणे - मुंबई - कोल्हापूर येथील मंडळीही जर पानाची दुकानं टाकल्यासारखे चित्रपट काढतात, तर त्यातच हे मराठवाड्यातील माणसाचे जरा अश्लील फोटो फ्रेम करून लावलेले आणखी एक पानाचे दुकान सहज खपून जाईल.

—कलंदर

# चित्रपटाबाहेर....

## रसायनशाळांची महत्त्वपूर्ण 'कामगिरी'

आपला चित्रपट निश्चित अशा वितरणक्षेत्रात प्रदर्शित करण्याच्या बदल्यात निर्मात्याला बाजारातून गल्ला उपलब्ध होत असतो. फायनान्सर आणि निर्माता याच्यात झालेल्या साटेलोट्यानुसार (यालाच करार वगैरे म्हणतात) एखाद्या निश्चित ठिकाणी अथवा वितरणक्षेत्रात चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर निर्मात्यानं व्याजासहित कर्ज परत करण्याचं बंधन त्याच्यावर असतं. काळ्या पैशाच्या देवी-घेवीबाबतही याच पद्धतीने करार-मदार केले जातात.

या करारांवर सह्या अनेक वेळा रसायनशाळेत केल्या जातात. कच्च्या फिल्म्सवर प्रक्रिया करणाऱ्या या रसायनशाळा अशा वेळी चौकीदाराचं काम करतात. निर्मात्याकडून जोपर्यंत पैशाची वसुली होत नाही तोपर्यंत वितरणासाठी त्याच्या चित्रपटाच्या प्रती अडविण्याचं काम याच रसायनशाळेत केलं जातं. पैसे वसुलीसाठी अनेक कलाकार, तंत्रज्ञ व इतरजण याच पद्धतीचा अवलंब करतात आणि निर्मात्याला प्रती उपलब्ध करण्याचे रसायनशाळेच्या चालकाकडून नाकारले जाते. गंमत म्हणजे रसायनशाळेचे चालक यॉ सेवेसाठी कोणतेही कमिशन आकारत नाहीत. एका अर्थाने पोस्टखात्यासारखी बिनबोभाट व विनामूल्य सेवा रसायनशाळेतर्फे चित्रपटउद्योगातील मंडळींना उपलब्ध असते.

अशा या रसायनशाळांवर चित्रउद्योगाच्या इतिहासात प्रथमच आयकर अधिकाऱ्यांनी धाडी टाकून चित्र-उद्योगाचे नाकच पकडले. त्यामुळे नेतृत्व करणाऱ्यांनी आपोआपच बोंबाबोंब सुरू केली. या वेळी मुंबईतील रँमनार्ड, फेमस (ताडदेव), फिल्मसेंटर, बॉंबे लॅबोरेटरी, फेमस (महालक्ष्मी), नवरंग इत्यादी रसायनशाळांवर एकाच वेळी धाडी घालण्यात आल्या.

रसायनशाळांना प्रिंट बनविण्यासाठी जी कच्ची फिल्म दिली जाते त्यातील १० टक्के 'वेस्ट' म्हणून गृहीत धरलेली असते. वास्तवात इतक्या प्रमाणात कच्ची फिल्म वाया जात नसते. रसायनशाळा या उरलेल्या कच्च्या फिल्म्सचा उपयोग बेकायदेशीर अथवा अयोग्य मार्गाने चित्रपटांच्या तयार प्रिंटस बनविण्यासाठी करते. स्मगलिंगद्वारे ही कच्ची फिल्म परदेशी बाजारपेठेत विकली जाते किंवा देशातीलच गरजूंना काळ्या बाजारात विकली जाते. याशिवाय रसायनशाळेत कच्च्या फिल्मवर रासायनिक प्रक्रिया करताना 'हायपो' मधून चांदी निघते. साधारण: प्रत्येक रसायनशाळेत दर दिवशी एक किलो चांदी निघते. या चांदीवर खरं तर निर्मात्याचा अधिकार असूनसुद्धा रसायनशाळाच आपला हक्क सांगतात. अशा या रसायनशाळेवर डिसेंबरात आयकर अधिकाऱ्यांनी धाडी घालून तीस लाख रुपयाची चांदी जप्त केली! तर अनेक ठिकाणी बेहिशेबी कागदपत्रे मिळाली. या निमित्ताने अधिकाऱ्यांनी शाळाचालकांना चांगलाच 'धडा' शिकविला! □


वीस व्यक्तिशोधांचा संग्रह

**देवाघरचा पाऊस**

लेखक : रवींद्र पिंगे

आवृत्ती : दुसरी

किंमत : दहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

तात पं. के. ल. दप्तरी, प्रज्ञानेश्वर यती यांच्यासारखे संत व स्वातंत्र्यवीर सावरकर, एम. एन रॉय, अनेक मार्क्सवादी व मानवतावादी दिसतात. जडवादी वा भौतिकवादी हे केवळ स्वार्थी व इंद्रियांच्या भोगांनाच प्राधान्य देणारे असतात, हे खरे नव्हे. त्यांच्यात अत्यंत त्यागी, मानवाच्या उद्धारार्थ जीवन समर्पित करणारे किती तरी दिसतात.

'बुद्धिप्रामाण्यवाद म्हणजे पाश्चात्याचे अंधानुकरण' या विधानाचा व्यत्यास असा होतो की, 'पाश्चिमात्य हे बुद्धिप्रामाण्यवादी असतात' हेसुद्धा निखालस चुकीचे विधान आहे. आपण ज्याना भौतिकवादी म्हणतो अशा पाश्चिमात्यांपैकी बहुसंख्य लोक पक्के धर्मनिष्ठ असतात, पोपला परमेश्वराचा अंश मानतात, बायबलमधल्या अनेक अशास्त्रीय विधानावर अंध विश्वास ठेवतात आणि आता तर त्यात हे बरेच जण 'कर्म आणि पुनर्जन्म' या भारतीय सिद्धाताच्या प्रेमात पडले आहेत. यावरून हे सहज सिद्ध होईल की, बुद्धिप्रामाण्यवादाचा उगम भारतीय तत्त्वज्ञानातच झाला आहे आणि नुसतेच चार्वाकाच्या एखाद्या 'ऋणं कृत्वा घृतं पिबेत्'सारख्या श्लोकार्धाचा आधार घेऊन त्याची टवाळी करणे योग्य नव्हे. आजही पाश्चात्य आणि पौर्वात्य जनसामान्यांच्यामध्ये रुजलेल्या अशास्त्रीय अंधश्रद्धा दूर करून त्याना शास्त्रीय दृष्टिकोन प्राप्त करून देण्यात भारताला आघाडीची कामगिरी बजावता येईल.

'मी बुद्धिप्राण्यवादी आहे' असे म्हणताच ज्या जबरदस्त प्रश्नाच्या सरबत्तीला तोंड द्यावे लागते ती काहीशी अशी असते–

'हे जग कोणी निर्माण केले? ते कोण चालवते? जीव कसा निर्माण झाला? या महान विश्वाचा हेतू काय? प्रयोगशाळेत तुम्ही एखादा जीव फार काय एखादी पेशी निर्माण करू शकाल काय? निरनिराळ्या लोकाचे वेगवेगळे भवितव्य का असते तुम्ही सागू शकाल काय? जर तुम्हाला या प्रश्नाची समाधानकारक उत्तरे देता येत नसतील तर या सर्व गोष्टीचे नियंत्रण करणारी कोणी एक श्रेष्ठ शक्ती आहे असे आम्ही मानले तर तुमचे काय बिघडते? जसा पतप्रधानाशिवाय देश असू शकत नाही, सेनापतीशिवाय सैन्य असू शकत नाही, साहेबाशिवाय कचेरी असू शकत नाही, हेडमास्तरशिवाय शाळा असू शकत नाही, तसेच परमेश्वराशिवाय जग असू शकत नाही. ही परमेश्वराची सिद्धता! समजले? आता अशा प्रश्नाला उत्तर द्यायचे म्हणजे प्रथम एक गोष्ट मान्य केली पाहिजे की, जगातल्या सर्व प्रश्नाना बुद्धिप्रामाण्यवादात तयार उत्तरे नाहीत. आम्हाला सर्व प्रश्न उलगडले आहेत, असे फक्त धर्मश्रद्धा मानतात. कुठलेही शास्त्र मानत नाही. माणसाचे अज्ञान हे मोजता येणार नाही इतके अफाट आहे. तुलनेने माणसाचे या जगाबद्दलचे ज्ञानही अगदी य.कश्चित आहे. तरीही आमचा असा आग्रह असतो की, प्रश्न कोणताही असो, बुद्धीचा आणि शास्त्रीय सिद्धाताचा वापर करून उत्तर शोधण्याचा प्रयत्न करा. 'परमेश्वरी इच्छा' असे एकमेव तयार रामबाण उत्तर कुठल्याही अनुत्तरित प्रश्नाचे मानू नका. आपल्याच देशात अगदी काही शतकापूर्वी कॉलरा आणि देवी हे रोग देवाच्या अवकृपेमुळे होतात असा समज होता. ('देवी' हे नावच त्यावरून पडले आहे) या देवताना शात करण्याकरता पूजा, यज्ञ, प्रार्थना हे उपाय केले जात. परमेश्वर मानणारे कोणीही लोक अद्यापही हे रोग परमेश्वराच्या अवकृपेमुळेच होतात असे मानतात काय? पूजा-नैवेद्याचा श्रद्धेचा मार्ग आणि लस टोचण्याचा शास्त्रीय मार्ग यातला कुठला ते पत्करतील? यातला कोणता तर्कसंगत वाटतो? धर्मतत्त्वावर आणि श्रद्धेवर आधारलेल्या समजुती शास्त्रीय दृष्टिकोनातून शोध घेता खोट्या ठरल्याची शेकडो उदाहरणे दाखवता येतील. अशा तऱ्हेचा शास्त्रीय दृष्टिकोन जोपासणे एवढेच बुद्धिप्रामाण्यवादाचे उद्दिष्ट होय. सर्व प्रश्नाना उत्तरे देणे हे नव्हे!

### मनोहारी भक्तिमार्ग

आणखी काही मंडळीचा असा दावा असतो की, अतिशय मनोहारी असा 'भक्ति' मार्ग, पूजा, अनेक देवताचा सुदर सुदर मंदिरे, ज्योतिषशास्त्र, हस्तसामुद्रिक, मंत्रशास्त्र, नाना प्रकारचे यज्ञयाग ही सर्व आमच्या प्राचीन परंपराची विविध अंगे आहेत, आमची संस्कृती आहे, आमच्या पूर्वजाच्याकडून मिळालेला वारसा आहे आणि याची टवाळी उडवण्याचा, याना तुच्छ लेखण्याचा, त्याना नष्ट करण्याचा या तथाकथित बुद्धिप्रामाण्यवाद्याना काय अधिकार आहे? फार काय असे काही करणे म्हणजे महान भारतीय संस्कृतीचा पायाच उखडून टाकण्यासारखे आहे. आता आपण दोन गोष्टीचा तपास करू. (१) खरोखर भारतीय परंपरा काय होती? (२) या पायामुळे समाजाच्या इमारतीला खरोखर आधार मिळतो की ती कमताकद होते?

मैत्र्योपनिषदातील (अ ७ श्लो ८) एकच ओळ पुरेशी बोलकी आहे. 'अथ ये चान्ये राक्षसभूतगणपिशाचोरग्रहादीनाम् अर्थ पुरस्कृत्य शमयाम इत्येवं ब्रुवाणा वैदिकेषु परिस्थातुम् इच्छन्ति तैः सह न संवसेत, प्रकाशभूता वै ते तस्करा अस्वर्ग्या इति।'

अर्थ स्पष्ट आहे. 'आणखी काही लोक राक्षस, भूते, पिशाचे, ग्रह यांची भीती घालून त्याची शाती करण्याकरता करण्याचे विधी वैदिक विधीत समाविष्ट करण्याच्या प्रयत्नात असतात. त्याच्या सहवासात राहू नये. हे लोक अज्ञानी, चोर, सबब स्वर्गप्राप्तीला अयोग्य असतात.'

दुसरा श्लोक आहे महाभारतातील–

कुशीलको देवलको नक्षत्रैर्यश्च जीवति।

इदृषै. ब्राह्मणैर्भुक्तं अपाङ्क्तेय युधिष्ठिर॥

हे युधिष्ठिरा, देवळात पूजा करून आणि ग्रहनक्षत्राचे फल सांगून उपजीविका करणाऱ्या ब्राह्मणाना जेवताना तुझ्या पक्तीलादेखील घेत जाऊ नकोस.

यावरून हे सहज सिद्ध होईल की बुद्धिप्रामाण्यवादी मंडळीच पुरातन परंपरा टिकवून धरण्याच्या प्रयत्नात आहेत. उलट आपल्या तत्त्वज्ञानात आगंतुकपणे आलेल्या ज्या ज्या तत्त्वाची वाढ

आता एखाद्या विषवल्लीमारखी फोफावली आहे आणि मूळच्या सुंदर तत्त्वज्ञानाचा बगीचा त्यांनी ओळखू न येण्याइतका झाकोळून टाकला आहे, त्याचाच पाठपुरावा तथाकथित सनातनी मंडळी करत आहेत.

आता आपण या तथाकथित गौरवास्पद परंपरेतील फक्त दोनच उदाहरणे घेऊ आणि बुद्धिप्रामाण्यवादी विचाराच्या प्रकाशझोतात त्याची पहाणी करू.

देऊळ (किंवा चर्च किंवा मशीद) ही धार्मिक श्रद्धास्थाने म्हणून सर्वत्र मान्यता पावलेली महत्त्वाची परंपरा आहे. पूर्वीच्या काळी अशी प्रत्येक मोठी संस्था म्हणजे एक विश्वविद्यालय होते. तिच्या आसऱ्याने धर्मतत्त्वांचा अभ्यास, धर्मचर्चा, प्रवचने, प्रार्थना, कीर्तने इ. च्या सहाय्याने धर्मजागरण, शिल्पकला, संगीत, नृत्य, वाद्य-वादन या कलांचा अभ्यास, फुलझाडांची, वृक्षांची जोपासना, निराश्रितांना आसरा, दीनदुबळ्यांना दान-धर्म, स्थानिक न्याय-पंचायत, उत्सवाचे केंद्रस्थान अशी विविध स्वरूपाची समाजोपयोगी कामे पार पाडली जात. अनेक मोठी देवालये शत्रूविरुद्ध किल्ल्या-सारखी वापरली जात. आज विसाव्या शतकात यापैकी कुठले कार्य या संस्था पार पाडतात? काही पुजारी आणि नारळ, फुलवाले यांचा चरितार्थ चालण्याव्यतिरिक्त बहुतेक देवळे आजकाल निरुपयोगी झाली आहेत. (इंग्लंडमध्ये तर अनेक पुरातन चर्चेस विकायला काढली आहेत.) पूर्वीच्या काळी या देवस्थानांकरवी पार पडणारी कार्ये आज जर अन्य संस्था जास्त चांगल्या पद्धतीने पार पाडत असतील, तर या जुन्या संस्था लोकांच्या मनातून उतरणे आणि नामशेष होणे साहजिक आहे. त्या निकालात निघणेच क्रमप्राप्त आहे. याउलट आजही आपण अनेक शहरांतून नवनवीन देवळे उभारली जात असलेली पहातो. वाचनालय, क्रीडांगण, शाळा किंवा रुग्णालय यांची आज समाजाला देवालय, मशीद वा चर्चपेक्षा जास्त जरुरी आहे. असे असताना या संदर्भहीन रूढींना चिकटून रहाण्यात काय अर्थ आहे? एके काळी सती जाण्या-चीही थोर भारतीय परंपरा होती. आज ती चालूच ठेवणे योग्य ठरेल काय?






देवळाइतकाच जगभर पसरलेला परंपरागत अंधश्रद्धेचा दुसरा प्रकार म्हणजे फलज्योतिष. या बाबतीत माझी मते न मांडता, काही महिन्यांपूर्वी जगातील नामवंत अशा १९२ शास्त्रज्ञांनी एक पत्रक काढले आहे. तेच इथे भाषांतर करून देत आहे. (शेवटी पहा) या पत्रकाच्या प्रती मी महाराष्ट्रातील वृत्तपत्रांतून दर आठवड्याला फल-ज्योतिषाचा रतीब घालणाऱ्या बहुतेक सर्व ज्योतिषमार्तंडांना पाठ-वून याबद्दलच्या त्यांच्या प्रतिक्रिया विचारल्या होत्या. त्यांपैकी मोजून दोन जणांची उत्तरे आली. बंगलोरच्या 'अॅस्ट्रॉलॉजिकल मॅगे-झिन'चे संपादक बी. व्ही. रामन यांनीही हे पत्रक पाठवले होते. त्यांनी उत्तरादाखल त्यांची दोन पुस्तके पाठवली. मात्र या सर्वांत ज्योतिष हे शास्त्र कसे हे सांगणारा आकडेशास्त्रीय पुरावा काडी-इतकाही नव्हता!

माझ्या परिचयाच्या एका शाळकरी मुलाने एकाच रविवारी निरनिराळ्या साप्ताहिकांतून (केसरी, रविवार सकाळ, महाराष्ट्र टाइम्स, Illustrated Weekly, Times of India, लोकसत्ता, आणि जत्रा) प्रसिद्ध होणाऱ्या राशिभविष्यांची तुलना करून एक-मेकांच्या सरळ सरळ विरोधी भविष्याच्या कात्रणांचा आल्बमच तयार केला आहे. या राशिभविष्यनामक उघड उघड बनवेगिरीला खरे तर कायद्याने बंदी घालायला हवी. यावर काही लोक असा आक्षेप घेतात की, या निमित्ताने का होईना लोक वृत्तपत्रे घेऊन वाच-तात तरी! राशिभविष्य बंद केले तर वृत्तपत्रांचा खप एकदम ढास-ळेल आणि त्यांना जगणे मुष्किल होईल; नेमका हाच युक्तिवाद मटक्याचे आकडे प्रसिद्ध करणारी वृत्तपत्रे करीत असतात; पण आणीबाणीचे काळात हे आकडे बंद झाले होते त्या वेळी काही कुठले वृत्तपत्र बंद पडलेले दिसले नाही!

तर मंडळी, बुद्धिप्रामाण्यवादी म्हणजे उगाच कोणी तिरक्या डोक्याचे, प्रसिद्धी स्टंट म्हणून काहीही भकणारे चक्रम लोक असतात या कल्पना काढून टाका. मी सांगतो म्हणून नव्हे, तर तुमचा तुम्ही निर्भयपणे विचार करा आणि योग्य तो निर्णय घ्या! □

## फलज्योतिषाविरुद्ध आक्षेप
## १९२ विद्वान शास्त्रज्ञांचे निवेदन

जगातील विविध भागांत फलज्योतिषाला मान्यता मिळत अस-ल्याचे पाहून विविध क्षेत्रांतील शास्त्रज्ञ मंडळींना चिंता वाटू लागली आहे. आम्ही खाली सही करणारे—खगोलशास्त्र, तारकाशास्त्र आणि इतर शाखांतील शास्त्रज्ञ ज्योतिषी मंडळांच्याकडून खाजगी-रीत्या केली जाणारी भाकिते आणि दिला जाणारा सल्ला, ही निःशंकपणे स्वीकारण्याविरुद्ध जनतेला सावध करू इच्छितो. ज्योतिष-शास्त्रावर विश्वास ठेवू इच्छिणाऱ्यांनी हे लक्षात घ्यावे की, या

विषयाच्या तत्त्वांना कोठलाही शास्त्रीय पाया नाही.

प्राचीन काळी लोक ज्योतिषांच्या भाकितावर आणि सल्ल्यावर विश्वास ठेवीत याचे कारण जगाविषयी असणाऱ्या त्यांच्या अद्भुत कल्पनांपैकीच ज्योतिष हा एक भाग होता. आकाशस्थ ग्रहगोल म्हणजे परमेश्वराची वसतिस्थाने अथवा स्वरूपे आहेत, त्यामुळे पृथ्वीवरोल घटनांशी त्यांचा निकटचा संबंध असतो अशी त्या वेळी समजूत होती. पृथ्वीपासून हे ग्रहगोल प्रत्यक्षात किती प्रचंड अंतरावर आहेत याची त्यांना कल्पना नव्हती. आता ही अंतरे मोजता येतात आणि मोजली गेली आहेत. त्यामुळे दूरवर असणारे ग्रह आणि त्याहीपेक्षा दूर असणारी नक्षत्रे यांचा गुरुत्वाकर्षणामुळे वा अन्य शक्तीमुळे होणारा परिणाम किती अत्यल्प असणार हे आपल्याला सहज समजून येते. आपल्या जन्माचे वेळी असणाऱ्या ग्रह आणि नक्षत्रांच्या स्थितीचा परिणाम आपल्या पुढील सर्व आयुष्यावर होतो अशी कल्पना करणे पूर्णपणे चूक आहे. त्याचप्रमाण या दूरवरच्या आकाशस्थ ग्रहांच्या स्थितीनुसार काही विशिष्ट कार्यासाठी विशिष्ट दिवस शुभ अथवा अशुभ असतात, असे मानणे किंवा ज्या राशीत जन्म झाला असेल त्यानुसार त्याचे इतरांशी पटेल वा न पटेल हे ठरवणे, यात काहीही तथ्य नाही.

मग लोक फलज्योतिषावर विश्वास का ठेवतात ? या अस्थिर जगतामध्ये आपल्याला योग्य निर्णय घेण्याच्या दृष्टीने कुणाचे तरी मार्गदर्शन असल्याचे समाधान लाभावे अशी अनेकांची इच्छा असते. आपल्या नियंत्रणापलीकडे असणारी आणि अवकाशस्थ शक्तींनी निश्चित केलेली कोणी नियती त्यांना विश्वासार्ह वाटते; पण परिस्थितीला आपल्या सर्वांना सामोरे गेले पाहिजे आणि आपले भविष्य कुठल्या ताऱ्यांच्या हाती नसून आपल्याच हाती असते हे आपण ओळखले पाहिजे.

आधुनिक काळात ज्ञानाचा आणि शिक्षणाचा सर्वदूर प्रसार होत असताना जादू आणि अंधश्रद्धा यावर आधारित विश्वासांचा उपहास करण्याची जरूरच पडू नये असे कोणाला वाटले तरीही, आधुनिक समाजात सर्वत्र फलज्योतिषाचा प्रसार वाढतच आहे. प्रसारमाध्यमे आणि एरवी मान्यवर असणारी वृत्तपत्रे, मासिके आणि पुस्तक-प्रकाशने यातून होणाऱ्या फलज्योतिषाचे आलेख, भाकिते आणि पत्रिका यांच्या सातत्याने होणाऱ्या अनिर्बंध प्रसारामुळे आम्ही अतिशय व्यथित झालेलो आहो. याचा परिणाम केवळ बुद्धिप्रामाण्य-विरोधी आणि अशास्त्रीय विचारांचा फैलाव होण्यात होणार आहे. आम्हाला असे वाटते की, या फलज्योतिषी भोंदूबुवांच्या अवास्तव दाव्यांना सरळसरळपणे आणि उघडपणे आव्हान देण्याची वेळ आलेली आहे.

हे उघड आहे की, ज्योतिषांच्या तत्त्वांना खात्रीशीर असा शास्त्रीय पाया नाही. उलट या तत्त्वांच्या विरोधी मात्र सबळ पुरावे आहेत. हे जाणूनही लोक या विषयात अजूनही श्रद्धा बाळगतात.

बार्ट जी. बॉक, निवृत्त प्राध्यापक, खगोलशास्त्र, ॲरिझोना विद्यापीठ
लॉरेन्स इ. जेरोम, शास्त्रीय लेखक, सांताक्लारा, कॅलिफोर्निया.
पॉल कुर्ट्झ्, तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक न्यूयॉर्क विद्यापीठ, बफेलो
नोबेल पारितोषिकविजेते शास्त्रज्ञ.
हान्स ए. बेथे, निवृत्त प्राध्यापक, भौतिकशास्त्र कॉर्नेल.
सर फ्रॅन्सिस क्रिक, वैद्यकीय संशोधक मंडळ, केंब्रीज.
सर जॉन एक्लेस, जीवशास्त्र व जीवभौतिकीचे प्रा. न्यूयॉर्क विद्यापीठ, बफेलो.
गेरहार्ड हर्झबर्ग, संशोधक राष्ट्रीय संशोधन मंडळ, कॅनडा
वासिली लिओनिक, अर्थशास्त्राचे प्रा., हार्डवर्ड विद्यापीठ
कोनराड लॉरेन्झ, विद्यापीठ प्रा., ऑस्ट्रियन शास्त्रमंडळ.
आन्द्रे एम्. ल्वॉफ., मानव वैद्यशास्त्र प्राध्यापक, पाश्चर संस्था पॅरीस
सर पीटर मेडावार, वैद्यकीय संशोधन मंडळ, मिड्लिसेक्स
जेक्विस मोनोद, पाश्चर संस्था, पॅरीस
आणि इतर १८० शास्त्रज्ञ

□


तिसरी आवृत्ती



सांगत्ये ऐका

रसिकांची, समीक्षकांची,
सर्वसामान्य वाचकांची
मान्यता लाभलेले
हंसा वाडकर यांचे
अनोखे आत्मचरित्र
किंमत : बारा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# राजहंस प्रकाशन सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १. | टॉलस्टॉय–एक माणूस | सौ. सुमती देवस्थळे (दु. आवृत्ती) | रु. ५५–०० |
| २. | मॅक्झिम गॉर्की | ” ” | १०–०० |
| ३. | नाझी भस्मासुराचा उदयास्त | वि. ग. कानिटकर | ४५–०० |
| ४. | महाडचा मुक्तिसंग्राम | प्रा. रा. म. बिवकर, प्रा. झुंबरा कांबळे | २०–०० |
| ५. | लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी | पु. ल. इनामदार | २०–०० |
| ६. | एक होता कार्व्हर | सौ. वीणा गवाणकर | १५–०० |
| ७. | पश्चिमेचे पुत्र | ” ” | १४–०० |
| ८. | देवाघरचा पाऊस | ” ” | १०–०० |
| ९. | हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा | अशोक परळीकर | १२–०० |
| १०. | सांगत्ये ऐका | हंसा वाडकर (ति. आवृत्ती) | १२–०० |
| ११. | रातराणी | विजय तेंडुकर | १२–०० |
| १२. | आर् डॉक्युमेंट | अशोक जैन | १०–०० |
| १३. | टच् | अशोक प्रभाकर डांगे | १०–०० |
| १४. | गुजरायेतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७–०० |
| १५. | पूर्णिया | अनि अवचट (दु. आवृत्ती) | ६–०० |
| १६. | परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २–०० |
| १७. | सहा साहसे | दा. सी. देसाई | २–०० |

**राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ, पुणे ३०**

# पुणे वार्ता

पृष्ठ २ वरून

विद्यापीठाशी संलग्न करून घेण्यास किमान दीड ते पावणेदोन वर्षं लागतील, असा विद्यापीठ अधिकाऱ्याचा दावा आहे. म्हणजेच एकीकडे मागणी मान्य केल्यासारखं दाखवायचं आणि दुसरीकडे तिच्या अमलबजावणीसाठी भरपूर वेळ घालवून हवा काढून घ्यायची, असं शासनाचं धोरण असल्याची विद्यार्थ्यांची भावना झाली आहे. तसंच मुंबई-औरंगाबादमधल्या शासकीय कलासंस्थांच्या मागणीवर त्वरित निर्णय घेणारे राज्यशासन अशासकीय कलासंस्थांच्या बाबतीत मात्र चालढकल करत आहे व 'शासकीय-अशासकीय' असा दुजाभाव दाखवते अशी विद्यार्थ्यांची तक्रार आहे.

यामुळेच दोन एप्रिलला राज्याचे तांत्रिक शिक्षण व प्रशिक्षणमंत्री शिवाजीराव पाटील निलंगेकर यांना या कलासंस्थांच्या विद्यार्थ्यांनी एक निवेदन दिलं. पदवी-अभ्यासक्रमाच्या मागणीचा या निवेदनात पुनरुच्चार करून या बाबतचा निर्णय त्वरित न दिल्यास आंदोलन सुरू करण्याचा इशाराही विद्यार्थी कृतिसमितीने दिला होता. तरीदेखील नऊ एप्रिलपर्यंत शासनाने कोणतीही हालचाल केली नाही. तेव्हा विद्यार्थ्यांनी तेरा एप्रिलपासून सुरू होणाऱ्या शासकीय परीक्षांवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला.

बहिष्कार सुरूही झाला. मग शासनाचं अजगर थोडंसं वळवळलं. १४ एप्रिलला विद्यार्थ्यांबरोबर मंत्रिमहोदयांनी महाराष्ट्र राज्य कलासंचालनालयाचे संचालक बाबुराव सडवेलकर यांच्यासमवेत प्रदीर्घ चर्चा केल्यासारखं दाखवलं. पदवी-अभ्यासक्रम सुरू करण्याविषयी विद्यापीठाला सूचना पाठवण्यात आल्याचंही विद्यार्थ्यांना सांगण्यात आलं; पण नुसती सूचना पाठवून काहीही साधणार नाही, हे कळत असूनही आता आपण चेंडू विद्यापीठवाल्यांच्या. कोर्टात मारला आहे, विद्यार्थी आणि विद्यापीठवाले बघून घेतील, या समाधानात मंत्रीमहोदयांनी चर्चा संपवली.

विद्यार्थ्यांचं या चर्चेनं समाधान होणं शक्यच नव्हतं. दरम्यान वरिष्ठ शासकीय अधिकाऱ्यांनी या चर्चेबाबत विद्यार्थी आणि वृत्तपत्रांची दिशाभूल करण्याचाही हातखंडा प्रयोग करून पाहिला; पण यापैकी कशालाही बळी न पडता पुण्यातल्या 'अभिनव'च्या विद्यार्थ्यांनी बहिष्कार चालूच ठेवला आहे.

नुसतं परीक्षांवर बहिष्कार टाकून फारसं काही साधत नाही, हे लक्षात आल्यावर विद्यार्थ्यांनी चक्री उपोषणाला प्रारंभ केला. दरम्यान १८ एप्रिलला शहरातून एक मूक मोर्चाही काढला. २० एप्रिलपासून बेमुदत उपोषणाला बसण्याचंही घाटत आहे. पदवी-अभ्यासक्रमाबाबत शासनाकडून निश्चित लेखी निर्णय मिळेपर्यंत हे आंदोलन चालू ठेवण्याचा व अधिकाधिक तीव्र करण्याचा विद्यार्थ्यांचा निर्धार आहे.

विद्यार्थ्यांनी एवढी टोकाची भूमिका घेऊ नये, असं आवाहन करत शब्दांचे बुडबुडे काढणारे पुढारी गल्लोगल्ली भेटतील; पण शासनानेही याबातीत चालढकल करून विद्यार्थ्यांची ताकद अजमावण्याचा क्षुद्र प्रयत्न चालवला आहे, हेही या संदर्भात विसरता येणार नाही.

'तुम्हाला पदवी-अभ्यासक्रम देणार नाही, असं स्पष्टपणे सांगण्याची धमक या शासनाकडे नाही आणि जर पदवी-अभ्यासक्रम सुरू करण्याची शासनाची मनापासून इच्छा असेल तर मग त्या दृष्टीने आवश्यक कृती शासन अधिकार असूनही का करत नाही, हे कोडं उलगडत नाही. कारण विद्यापीठ यंत्रणेनुसार हा अभ्यासक्रम सुरू करण्यास जरी दीड-पावणेदोन वर्षं लागणार असली तरी शासनानं 'खास अधिकार' वापरण्याची परवानगी दिल्यास आम्ही तो येत्या शैक्षणिक वर्षापासूनसुद्धा (जून'८१) सुरू करू शकू, अशी याबाबत पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूंची भूमिका आहे. मग अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांवर लाठीमार होताच पुण्याच्या पोलीस-आयुक्तांच्या बदलीचे हुकूम काढणारे आमचे स्टंटबाज. मुख्यमंत्री या प्रश्नाबाबत एवढे गप्प का?

आत्ता तरी अशी बुचकळ्यात टाकणारी प्रश्नचिन्हं उभी करून शासनानं विद्यार्थ्यांना अधिकाधिक टोकाची भूमिका घ्यायला भाग पाडलं आहे, एवढं निश्चित!

—प्रतिनिधी

## अल्पशिक्षित ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी तंत्रशिक्षण

इन्व्हेस्टमेंट इन् मॅन ट्रस्ट व विद्यार्थी साहाय्यक समिति यांचेतर्फे ग्रामीण भागातील अल्पशिक्षित तरुणांसाठी सुतारकाम, प्लंबिंग, गवंडीकाम असे तीन अभ्यासक्रम आयोजित करण्यात येत आहेत.

अभ्यासाची मुदत प्रत्येकी सहा महिने आहे.
अभ्यासक्रमाचा काळ—१ मे ते ३१ ऑक्टोबर १९८१.
*विद्यार्थ्यांची शैक्षणिक पात्रता—किमान ८ वी.*
वय—१८ वर्षांचे पुढे.
प्रकृती सुदृढ असावी.
भोजन, निवास, शिक्षण याप्रीत्यर्थ रु. ७०।— खर्च येईल.
आर्थिक परिस्थिती सामान्य असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सवलतीचा विचार होऊ शकेल.

यापूर्वीच्या बॅचमधील जवळजवळ सर्व ३२ विद्यार्थ्यांना त्यांच्या सहा महिन्यांच्या प्रशिक्षणानंतर प्रत्यक्ष काम करण्याची संधी मिळाली असून रोजी रु ८ ते १० असे विद्यावेतन त्याना मिळायला लागले आहे.

१ मेपासून सुरू होणाऱ्या प्रशिक्षणासाठी ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश घ्यावयाचा असेल त्यानी शनिवार दि. २५ एप्रिल रोजी स्वतःच्या तपशीलवार माहितीसह अर्ज घेऊन पुढील पत्त्यावर सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळात प्रत्यक्ष उपस्थित रहावे मुलाखतीचा निर्णय लगेच कळविण्यात येईल.

**मुलाखतीसाठी येण्याचा पत्ता :**

विद्यार्थी साहाय्यक समितीचे नवीन वसतिगृह
पोलिसपरेडग्राउंडजवळ, फर्ग्युसन कॉलेज रस्ता, पुणे—४११ ००५.

MANOOS (Marathi Weekly) 100 Paise Regd. No. PNC–W 28
(Licensed to post without prepayment of postage–No. 11)

PADMAJA/M

# अक्षय सुखाच्या चिरंतन ओळी




महाबँकेच्या आवर्त ठेव योजनेच्या तुमच्या
पासबुकाच्या प्रत्येक पानावरील या ओळी म्हणजे
तुमच्या भविष्यातील अक्षय सुखाची ग्वाहीच !
या योजनेमध्ये तुम्ही दरमहा पांच रुपयांपासून
बचत करु शकता.

**महाबँक आवर्त ठेव योजना म्हणजे बचतीचा उत्तम मार्ग !**

बँकिंग सेवा

## बँक ऑफ महाराष्ट्र
(भारत सरकारचा उपक्रम)
मुख्य कार्यालय : पुणे

व्यक्तिगत जिव्हाळा